पुणे. वर्ष १४ वे. फेब्रुवारी २०१८. अंक दुसरा
पृष्ठसंख्या: ४४. किंमत रुपये ५०. वार्षिक वर्गणी रुपये ५००

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक

संपादक
डॉ. दत्ता देशकर

## अकरावे जल साहित्य सम्मेलन, धुळे



## विशेषांक

सह आयोजक
भारतीय जल संस्कृती मंडळ,
शाखा धुळे

आयोजक
देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन
धुळे



स्वागताध्यक्ष श्री. रावसाहेब बढे उपस्थितांचे स्वागत करतांना



मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर प्रास्ताविक करतांना



सम्मेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. दि. मा. मोरे उद्घाटनपर भाषण करतांना




सम्मेलनाध्यक्ष डॉ, माधवराव चितळे अध्यक्षीय भाषण करतांना

# जलसंवाद

भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

■ फेब्रुवारी २०१८

■ संस्थापक संपादक
डॉ. दत्ता देशकर
कै. प्रदीप चिटगोपेकर

■ वर्तमान संपादक
डॉ. दत्ता देशकर – ०९३२५२०३१०९

■ मुखपृष्ठ व सजावट
अजय देशकर

■ अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
आरती कुलकर्णी

■ मुद्रण –
श्री. जे प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

■ वार्षिक वर्गणी : ५०० /–
पंचवार्षिक वर्गणी : रू. २०००/–
दशवार्षिक वर्गणी : रू. ३५००

■ जाहिरातींचे दर
मलपृष्ठ क्र. ४ रू. १००००/–
वेष्टण पृष्ठ २ व ३ रू. ७५०० /–
आतील रंगीत पान रू. ५००० /–
आतील साधे पान रू. ३०००/–

या अंकाचे मूल्य : रू. ५०/–

## अनुक्रमणिका

■ संपादकीय / ५
■ जलदिंडी –जलसंस्कृतीचा जागर
श्रीमती स्वाती जयंत नाईक / ७
■ जलसाहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा –
श्री. संजय झेंडे आणि प्रा. योगेश भामरे / ९
■ देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनचे जल क्षेत्रातील कार्य
श्री. सुनील सैंदाणे / १३
■ जलयुक्त शिवार योजनेचे यशापयश
प्रा. जगदीश अमृतराव कुवर / १५
■ खानदेशची जलसंस्कृती
प्रा. योगेश भामरे / १९
■ कवी संमेलन
डॉ. अस्मिता गुरव /२२
■ खुली मुलाखत – साहित्य विश्वात पाण्याच्या संगोपन, संवर्धनावर मंथन आवश्यक : डॉ. माधवराव चितळे
पत्रकार श्री.अमोल पाटील, दिव्यमराठी/ २६
■ युवा पिढी आणि पाणी
प्रा. योगेश भामरे / २८
■ माध्यमे आणि जलसाक्षरता
श्री. जितेंद्र तलवारे/ ३१
■ जल उत्पादकता
प्रा. डॉ. संजय पाटील / ३४
■ समारोप समारंभ दिनांक २१ जानेवारी, २०१८
श्री. संजय झेंडे / ३७
■ जलसाहित्य संमेलन – आशा आणि आकांक्षा
श्री. गजानन देशपांडे / ४०
■ अकरावे सम्मेलन डिजिटल झाले.............
डॉ. दत्ता देशकर / ४४

जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० येथे छापून अे – २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे – ४११०४५ येथे प्रसिध्द केले. संपादक डॉ. दत्ता देशकर
फोन : ०९३२५२०३१०९ Email : jalasamvad@gmail.com,



**श्री.संजय झेंडे**
**अतिथी संपादक**

मागील वर्षीप्रमाणे याही वर्षी जल साहित्य सम्मेलनाच्या विशेषांकाचे अतिथी संपादकत्व स्विकारल्याबद्दल श्री. झेंडे यांचे जलसंवाद मासिक ऋण व्यक्त करते. श्री. झेंडे यांना मागील वर्षी जलसंवाद मासिकातर्फे मासिकात उत्कृष्ट लेखन केल्याबद्दल चिपळूण जल साहित्य सम्मेलनात पुरस्कारपण देण्यात आला होता. गेल्या वर्षीपासून दर अंकात कव्हर स्टोरीजचे लेखन करण्याची जबाबदारीही श्री. झेंडे यांनी स्विकारली आहे. हा स्नेह असाच वृद्धींगत व्हावा हीच सदिच्छा.

## संपादकीय .............

### धुळ्याचा सांस्कृतिक अनुशेष भरुन काढणारे जल साहित्य संमेलन

खान्देशची सांस्कृतिक राजधानी असं बिरुद अभिमानानं मिरविणारं धुळे शहर गेल्या आठ–दहा वर्षांतील कारनाम्यांमुळे मालेगाव–भिवंडीच्या पंक्तीला जाऊन बसलं हे खरय. परंतू या शहराचा मूळ पिंड जरा वेगळा आहे. लगतच्या जळगाव आणि नाशिक या शहरांमध्ये आर्थिक संपन्नता अथवा भौतिक साधनांची रेलचेल आढळते. त्यामुळे या शहरांना लाभलेली समृध्दीची झळाळी धुळ्यास कधी लाभलेली नाही, हे खरे. मात्र पांझरा नदीच्या दुतर्फा वसलेल्या या टुमदार शहरात साधना झाली ती ज्ञानप्राप्तीची, निर्मिती झाली ती संशोधन संस्थांची आणि उभारणी झाली ती दुर्मिळ ग्रंथांनी समृध्द असलेल्या संग्रहालये व ग्रंथालयांची. स्वाभाविकच संशोधक, धर्मचिकित्सक, शिक्षणप्रेमी, अभ्यासक, स्वातंत्र्य सेनानी, आंदोलक, साहित्यिक यांच्या पसंतीचं शहर अशी धुळ्याची ओळख निर्माण झाली. तथापि मधल्या काळात ही परंपरा क्षीण झाली. जातीय दंगली आणि गुन्हेगारी टोळ्यांमधील रक्तरंजीत संघर्ष यामुळे शहर सतत चर्चेत राहिले. या घटनांमधील वारंवारिता शहराचा सांस्कृतिक चेहरा काळवंडण्यास कारणीभूत ठरली. या पार्श्वभूमीवर जानेवारी २०१८ मध्ये अकरावे जलसाहित्य संमेलन शहरात भरले. याआधी सन १९४४ मध्ये कै. मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन धुळ्यात झाले होते. त्यानंतर तब्बल ७३ वर्षांनी राज्यस्तरीय व्याप्ती असलेले साहित्य संमेलन धुळयात झाले. शहराच्या सांस्कृतिक विश्वाला चैतन्य देणारा हा सोहळा ठरला. सांस्कृतिक अनुशेष भरुन काढणारा एक ठोस उपक्रम यादृष्टीकोनातूनही धुळेकरांनी या संमेलनाकडे विशेष ममत्वाने पाहिले.

पांझरा नदी ही धुळे जिल्ह्यातील चार पैकी तीन तालुक्यांची जीवन रेखा आहे. सिंचनाच्या प्राचीन फड पध्दतीचे अवशेष पांझरेच्या उपखोऱ्यात आढळतात. त्या पांझरा नदीच्या काठावर वसलेल्या धुळे शहरात **देशबंधू गुप्ता नगरीत** अकरावे जल साहित्य संमेलन अतिशय उत्साहात संपन्न झाले. या संमेलनाच्या दोन दिवसांच्या कालावधीत विविध सत्रांमध्ये पाण्याशी संबंधित अनेकविध पैलूंवर चर्चा झाली. तज्ज्ञ व मान्यवरांनी हजेरी लावली. पाण्याची गुणवता, प्रदुषण, साठवणूक, जपवणूक, काटकसरीने वापर आणि जलविज्ञानापासून पाण्याच्या अर्थशास्त्रापर्यंत विषय हाताळले गेले. हे संमेलन धुळ्यात झाले नसते तर या अमूल्य माहितीपासून धुळेकर वंचित राहिले असते. **खानदेशातील जल संस्कृती** या सत्राच्या निमित्ताने या भूमीतील जलपुरुषांनी उभारलेल्या कार्याचा परिचय उपस्थितांना झाला. संमेलनामुळे धुळेकरांच्या जलसाक्षरतेबाबतच्या कक्षा रुंदावल्या, जलसाक्षरतेच्या जाणीवा तीक्ष्ण झाल्या आणि एकूणच पाणी प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होण्यास मदत झाली. हे नक्की.

गेल्या वर्षी जानेवारी २०१७ मध्ये चिपळून येथे भरलेल्या दहाव्या जलसाहित्य संमेलनास उपस्थित राहण्याची संधी डॉ.दत्ता देशकर यांच्यामुळे लाभली. या संमेलनावर आधारित जलसंवादच्या फेब्रुवारी २०१७ च्या विशेषकांचे अतिथी संपादकत्व त्यांनी माझ्याकडे सोपविले होते. महाराष्ट्र टाइम्स् च्या निमित्ताने पंचवीस वर्षे पत्रकारितेत वावरलेल्या माझ्या सारख्या एका जिल्हा वार्ताहरचे प्रमोशन या संमेलनामुळे झाले. चिपळून संमेलनामुळेच असे संमेलन धुळ्यात व्हावी अशी इच्छा बळावली. तेथून परतांना या अनुषंगाने डॉ.देशकरांशी चर्चा झाली त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. परंतू जलसाहित्य संमेलनाचा एकंदर राज्यव्यापी आवाका पाहता स्थानिक कार्यकर्त्यांची फळी आणि आर्थिक निधीची उपलब्धता या दोन्ही आघाड्यांवर धुळ्याची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. त्यात धुळ्यातील जल कार्यकर्त्यांना बांधून ठेवणाऱ्या मुकुंदराव धाराशिवकरांसारख्या जलनायकाची उणीव होतीच. सेनापती नसल्यामुळे विखुरलेल्या सैन्याची जमवाजमव मुकुंदरावांच्याच प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने करण्यात आली. डॉ. देशकरांच्या उपस्थितीत निर्णय झाला आणि जल साहित्य संमेलन यशस्वीपणे आयोजित करायचेच या ध्यासाने टीम धुळे कामास लागली. पुढे सतीश खाडे यांच्या सहयोगाने देशबंधू व मंजू गुप्ता फाउंडेशन, रावसाहेब बढे आणि त्यांची धुळे येथील टीम यांची नाळ जुळली. देशबंधू गुप्ता फाउंडेशनसारख्या ग्रामीण विकासासाठी एका निश्चित दिशेने काम करणाऱ्या स्ययंसेवी संस्थेचे प्रायोजकत्व लाभले, तेव्हाच संमेलनाच्या यशस्वीतेची पायाभरणी झाली होती.

कोणत्याही संमेलनाची यशस्वीता मोजण्याचे जे काही निकष असतील, ते सर्व निकष धुळ्यातील संमेलन निश्चितीच पूर्ण केले आहेत. मुख्य म्हणजे अशा स्वरुपाच्या कार्यक्रमांसाठी प्रेक्षकांची उपस्थिती हा आयोजकांच्या दृष्टीने चितेंचा विषय असतो. पाणी हे जीवन आहे असे आपण सतत म्हणत असलो तरी पाण्याला सेलिब्रिटींचा दर्जा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे जल साहित्य संमेलनासाठी नेमके किती प्रेक्षक येतील हा घोर लावणारा प्रश्न होताच. मात्र धुळ्यातील संमेलनाने या निकषाची पूर्तता देखील समाधानकारकरित्या केलेली दिसते. विशेष म्हणजे उपस्थित प्रेक्षक देखील एकाच पठडीतील नव्हते. देशबंधु व मंजू गुप्ता फाउंडेशनच्या ग्रामीण विकासाच्या विविध योजनांच्या अमलबजावणीच्या निमित्ताने जोडले गेलेले सरपंच, ग्रामीण भागात काम करणारे कार्यकर्ते दोन दिवस या संमेलनात समरसुन सहभागी झाले. भारतीय जल संस्कृती मंडळाच्या स्थानिक शाखेतील सदस्यांमध्ये प्राध्यापक मंडळींची संख्या चांगली आहे. त्यांच्या प्रयत्नाने पदवी, पदवीव्युत्तर अभ्यासक्रमाचे तसेच एम.बी.ए. व अभियांत्रिकी या व्यावसायिक विद्याशाखांचे विद्यार्थी सहभागी झाले. पाटबंधारे विभागातील अभियंते देखील प्रेक्षकांमध्ये होते. उद्घाटन समारंभास असलेली गर्दी नंतरच्या सत्रांना अथवा दुसऱ्या दिवशी दिसत नाही असा सार्वत्रिक अनुभव आहे. मात्र धुळ्यात असे घडले नाही. प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला.

हा सहभाग रीतसर शुल्क भरुन व नोंदणी करुन होता, हे विशेष. भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था तर उत्तम होतीच. शिवाय व्यासपीठाला लाभलेला आधुनिक तंत्रज्ञानाचा स्पर्श व कलात्मक पध्दतीने करण्यात आलेली सजावट सुखावह वाटत होती. सत्रांमधील नियोजन, सुरु होण्याच्या व संपण्याच्या वेळा, नियोजित पाहुण्यांच्या ऐनवेळी येणे रद्द होणे आणि त्याऐवजी पर्यायी व्यवस्था या बाबी लीलया घडत होत्या. संमेलनाचे उद्घाटन व समारोप तसेच दोन दिवसातील सर्व सत्रांना प्रसारमाध्यमांनी स्थानिक आवृत्यांमध्ये भरभरुन प्रसिध्दी दिली. मात्र बहुतेक वृत्तपत्रांच्या धुळे जिल्ह्याबाहेरील अन्य आवृत्यांमध्ये अकरावे जलसाहित्य संमेलन झळकले नाही. पाण्यासारख्या महत्वाच्या विषयाच्या विविधांगी पैलूंवर तज्ज्ञांसमवेत झालेली चर्चा धुळ्यापुरती मर्यादित राहिली. ग्लोबलायझेशनच्या युगात वृत्तपत्रांचे या मागे लोकलायझेशनचे प्रेम आहे की, एखाद्या विषयाची व्यापकता लक्षात न येण्याचे वैचारिक दारिद्रय ! हा शोध घेण्याचा विषय होऊ शकतो. अर्थात ही खंत दूर करण्याचा प्रयत्न पुण्याच्या अभिजित टिळक आणि त्यांच्या चमूमुळे झाला. अकराव्या जलसाहित्य संमेलनातील सर्व सत्र आपल्या CBP India च्या माध्यमातून लाइव्ह प्रक्षेपित करुन त्यांनी डिजिटल विश्वात पोहोचविली.

जलसाहित्य संमेलन राजकारणापासून अथवा राजकीय व्यक्तींपासून दूर ठेवण्याचा प्रघात आहे. धुळ्यातील जलसाहित्य संमेलनात देखील हा प्रघात पाळण्यात आला. एरव्ही जिल्ह्यात अथवा शहरात होणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक अथवा धार्मिक उपक्रमांमध्ये राजकीय व्यक्ती अथवा या व्यक्तींचे कृपाछत्र लाभलेल्या संस्थांचा सहभाग असतोच. किंबहुना अशा स्वरुपाचे उपक्रम आयोजित करण्याची आर्थिक क्षमता या मंडळींकडेच आहे. धुळ्यातील जल साहित्य संमेलन मात्र अशा पाठबळापासून दूर होते. या संमेलनाने राजकीय व्यक्तींकडून काही घेण्यापेक्षा त्यांना देण्याचे काम केले. धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार कुणाल रोहिदास पाटील यांनी गेल्या सात–आठ वर्षांपासून धुळे तालुक्यामध्ये वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी योजनाबध्द प्रयत्न सुरु केले आहेत. त्यासाठी तज्ज्ञ भूगर्भ शास्त्रज्ञाच्या मदतीने त्यांनी सर्वेक्षण करुन प्रत्यक्ष काम देखील सुरु केले आहे. या कामाचे दृष्य परिणाम आता समोर येत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना यावर्षीचा जलनायक पुरस्कार संमेलनाच्या उदघाटन समारंभात प्रदान करण्यात आला. रुपये अकरा हजार, मानपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. संमेलानाच्या उदघाटन व समारोप समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून राजकारणाची झुल पांघरलेल्या व्यक्ती नव्हत्या. तर डॉ. माधवराव चितळे, डॉ. दि. मा. मोरे आणि डॉ.दत्ता देशकर यांच्यासारख्या पाणीमय झालेल्या ज्येष्ठांची पूर्णवेळ उपस्थिती होती. विशेष म्हणजे या संपूर्ण संमेलनात ज्येष्ठ जल तज्ज्ञ डॉ. माधवरव चितळे यांची पूर्णवेळ उपस्थिती अतिशय आनंददायी वाटत होती. त्यांचे संमेलनात असणे, वावरणे आणि त्यांचे बोलणे ऐकणे हा एक सुखदायी सोहळाच होता. भविष्यातील जल साहित्य संमेलनाच्या आयोजनाच्यादृष्टीने त्यांनी केलेले दिशादिग्दर्शन आयोजकांसाठी मौलिक ठरणार आहे. डॉ.माधवराव चितळेंची यापूर्वीच्या जल संमेलनांमधून झालेली भाषणे आणि प्रकट मुलाखतींमधून व्यक्त केलेले चिंतन यांचं एकत्रित पुस्तक प्रकाशित करण्यातचा भारतीय जल संस्कृती मंडळाने अथवा अन्य प्रकाशकांनी निर्णय घेतला तर यात खारीचा वाटा उचलण्यासाठी मी अग्रभागी राहील अशी ग्वाही या निमित्ताने देऊ इच्छितो. हे मौलिक विचारधन दस्तावेज स्वरुपात भावी पिढीपुढे आणणे अत्यंत आवश्यक आहे.

साहित्य संमेलनांमध्ये संमत झालेल्या ठरावांचे पुढे काय होते ? हा सतत कुतुहलाचा विषय राहिलेला आहे. सर्व गोष्टींच्या अमलबजावणी शासनावर अथवा समाजावर सोपवून स्वत: नामानिराळे राहण्याचा आयोजकांचा प्रयत्न असतो. धुळ्याच्या जलसाहित्य संमेलनात देखील ठराव संमत झाले. मात्र या ठरावांचा बाज जरा वेगळा आहे. पांझरा बारमाही आणि फड पध्दतीच्या बंधाऱ्यांना जागतिक वारसा देण्याचा विषय मार्गी लावण्यासाठी शासनाकडून अपेक्षा व्यक्त करणारा ठराव समारोप समारंभात संमत करण्यात आला. त्यासाठी नेटाने पाठपुरावा केला तर तो विषय मार्गी लागण्यास मदत होईल. मात्र सर्वच अपेक्षांची जबाबदारी एकट्या शासनावर ढकलण्याचा प्रयत्न भारतीय जल संस्कृती मंडळाने केलेला नाही. स्थानिक व परकीय भाषांमध्ये उपलब्ध असलेले पाणी प्रश्नांसंबंधीचे साहित्य अनुवादित करुन ते समाजापर्यंत पोहचविण्यासाठी पुढाकार घेण्याचा मानस भारतीय जलसंस्कृती मंडळाने व्यक्त केला. याशिवाय तापी नदीवर उभारण्यात आलेल्या प्रकाशा, सारंगखेडा आणि सुलवाडे बंधाऱ्यांमध्ये साठविण्यात आलेली पाणी वापरण्याची पध्दती सुचविण्यासाठी जी तज्ञांची समिती नेमली जाईल त्यास सहकार्य भूमिका घेण्यात आली आहे. सर्व विद्यापीठांतून पाण्याचे आयोजन, नियोजन व संयोजन करण्याच्या दृष्टीकोनातून पाण्यासंबंधीच्या व जलसाक्षरतेसारख्या विषयांचा समावेश करावा अशी ठरावाद्वारे मागणी करतानाच अशा स्वरुपाचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी भारतीय जल संस्कृती मंडळ पुढाकार घेईल असे अभिवचन देखील देण्यात आले आहे. ही सकारात्मक भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे.

पाणी वितरण व्यवस्थासाठीच्या भांडवली खर्चाची वसुली, पाण्याची गुणवत्ता, पशुधनासाठी देखील शुध्द पाण्याचा पुरवठा, पाण्याचा पुनर्वापर, कुरण विकास, शेतीला नळ प्रणालीव्दारे पाणी पुरवठा याविषयावर झालेले मंथन उपस्थितांच्या जाणीवा सजग करणारे आहे. प्रबोधनाचा टप्पा या जलसाहित्य संमेलनाच्या निमित्ताने अंशत: यशस्वी झाला असे म्हणण्यास वाव आहे. मात्र हे यांस संघटित स्वरुप देऊन यादृष्टीने सक्रीयता वाढविण्यासाची जबाबदारी आता स्थानिक मंडळींची आहे..

संजय झेंडे
अतिथी संपादक,
जलसंवाद फेब्रवारी २०१८
मो.९६५७७१७६७९
ई मेल -sanjayzenderediffmail.com

# जलदिंडी -जलसंस्कृतीचा जागर

**श्रीमती स्वाती जयंत नाईक, धुळे**
**मो.९४८२८८१००७**

**जलदिंडी**
**शुक्रवार दिनांक २०.०१.१८ – वेळ सकाळी ९ वाजता**
**सुरूवात : जयहिंद हायस्कूल, धुळे**
**विसर्जन : सभास्थान (वेदांत मंगल कार्यालय)**

मोटस्थल वाढावे व पाटस्थल जतन करावे ।
दुर्गावरील पाणी बहुत जतन करावे ।।
– छत्रपती शिवाजी महाराज

असे फर्मान खुद्द शिवाजी महाराजांनी सुध्दा आपल्या रयतेस दिले होते. आजची पाण्याची उपलब्धा बघता त्याचे महत्व लक्षात येते. पाण्याचे घटते प्रमाण आणि पाण्याच्या जपून व नियोजनपूर्वक वापराविषयी जनमानसात असलेली उदासिनता दूर व्हावी आणि जलसाक्षरता वाढीस लागावी याच उद्देशाने आपल्या धुळे शहरात ११ वे जलसाहित्य संमेलन दि. २० व २१ जानेवारी २०१८ या दोन दिवसांच्या कालावधीत पार पडले. अशा प्रकारचे जलसाहित्य संमेलन धुळ्यात प्रथमच होत होते. या जलसाहित्य संमेलनाची सुरूवात जलदिंडी ने करण्यात आली.

दि. २० जानेवारीस संमेलनाच्या उद्घाटनाच्या दिवशी सकाळी जलदिंडिचे आयोजन करण्यात आले होते. या जलदिंडीचा शुभारंभ सकाळी ९ वाजता जयहिंद हायस्कूलमध्ये करण्याचे योजिले होते. जलदिंडीमध्ये जयहिंद



हायस्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयहिंद हायस्कूलचे अध्यक्ष डॉ. श्री. अरूण साळुंके, नगरसेविका सौ. प्रतिभाताई चौधरी, भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर, जलसंस्कृती मंडळ धुळे शाखेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव भामरे, भारतीय जलसंस्कृती मंडळ महाराष्ट्र चे सचिव श्री. गजानन देशपांडे, वसुधा संस्थेचे अध्यक्ष श्री. वसंतदादा ठाकरे, श्री. डॉ. नेवाडकर अशा या सगळ्या उपस्थित मान्यवरांनी जलदिंडीतील पालखीचे पूजन केले आणि नंतर जलदिंडीस प्रारंभ झाला.

जल तेथे जीवन अर्थात मानवी उत्क्रांतीची खरी सुरूवात मानव नदीकाठी वास्तव्य करून राहिला लागल्यावर झाली असे म्हणता येईल. भारतीय संस्कृतीत नदीला मातेचा दर्जा दिला गेलाय, तेव्हा नद्यांचे हे महत्व लक्षात घेवून विविध पवित्र नद्यांचे पाणी असलेला हा जलकुंभ दिंडीतील या पालखीत ठेवण्यात आलेला होता. रंगीत फुलांच्या माळांनी सुशोभित करण्यात आलेली पालखी व जलकुंभ घेवून ही जलदिंडी, दिंडीत सहभागी मुले, मान्यवर व कार्यकर्त्यांसह पुढे मार्गस्थ झाली.

दिंडीच्या अग्रभागी



पालखीची धुरा वाहणारे जलप्रेमी पारंपारिक वेशभूषेत होते. त्यांच्याच मागोमाग नऊवारी साडी नेसून नटलेल्या शाळकरी मुली व टोप्या, नेहरू कुर्ता पायजामा घातलेली मुले घोषणा देत चालली होती. या मुलांच्या हाती पाण्याचे महत्व अधोरेखित करणारे फलक होते.

पाणी अडवा, पाणी जिरवा, असा संदेश देत मुले उत्साहाने दिंडीत मार्गक्रमण करीत होती. या सगळ्या विद्यार्थ्यांच्या हातात असणारे फलक धुळेकरांचे लक्ष वेधून घेत त्यांना अंतर्मुख होण्यास भाग पाडत होते.

चौफेर बांधावित बारवे ।
घाट उभारावेत नदीकाठी ।।
सकलांच्या यत्नांतून ।
उदक साठेल सर्वांसाठी ।।

असा अहिल्याबाई होळकरांनी दिलेला उपदेश असलेला फलक प्रभावीपणे पाण्याचे नियोजन कसे करावे हे सांगत होता. तसेच ...

पावसाचा थेंब जिथे पडेल, तिथेच त्याला पकडून ठेवा
धावते पाणी चालते करा, चालते पाणी रांगते करा ,
रांगते पाणी थांबते करा, थांबते पाणी जिरते करा.
नद्या आपल्या माता आहेत,
त्यांची नीट नीगा राखा
पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असतांना,
पाण्याने मोटारगाड्या धुळे पातक समाजावे.
पाण्याचा पुनर्वापर हा पाणी बचतीचा एक उत्कृष्ट मार्ग आहे.

या सारख्या अनेक घोषणा देत जलदिंडी पुढे पुढे वाटचाल करीत होती. जयहिंद कॉलनीतून निघालेली जलदिंडी इंदिरा गार्डन, तुळशीराम नगर अशी फिरून प्रमोद नगरमध्ये काही काळ थांबली. तिथे वनवासी कल्याण आश्रम शाळेच्या वस्तिगृहातील काही विद्यार्थीनींनी इथे पालखीत असलेल्या जलकलशाचे पूजन केले आणि जलदिंडी पुन्हा जल्लोषात पुढे निघाली. जलदिंडीच्या मार्गात ठिकठिकाणी त्या भागातील रहिवाशांनी रांगोळ्या काढून दिंडीचे स्वागत केले. जलदिंडी पाहण्यासाठी मार्गाच्या दुतर्फा धुळेकरांनी गर्दी केली होती. अशाप्रकारे धुळ्याच्या विविध भागातून मार्गस्थ होत जलदिंडी नकाणे रोड मार्गे संमेलनस्थळी म्हणजे वेदांत मंगल कार्यालयाच्या परिसरात दाखल झाली. इथे देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन (ल्युपिन कंपनी) संस्थेचे जलसाहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. रावसाहेब बढे व संस्थेचे इतर पदाधिकारी आणि उपस्थित मान्यवरांनी जलदिंडीचे स्वागत केले.

श्री. ॲड, रोहित कोहक यांचे जलदिंडीच्या नियोजनात विशेष योगदान व मार्गदर्शन तसेच देशबंधू फाउंडेशनचे श्री. भदाणे सर, वसुधा संस्थेचे कार्यकर्ते श्री. सतीश मोरे, सौ. मीना देवरे, जलदिंडी समितीचे कार्यकर्ते सौ. रूपाली नाईल, सौ. मनिषा देवरे, श्री.सुजित काटे यांचाही सहभाग व सहाय्य लाभल्याने जलदिंडी यशस्वीपणे पार पडली. अशी ही विलोभनिय जलदिंडि अनुभवल्यानंतर धुळेकरांमध्ये जलसाक्षरतेच्या जागरास प्रारंभ झाला...



जलम् जल स्थानगतिम्
सवर्धा एवं रक्षणीयम् ।
जन्तूनां सुख जीवनं हेतू
जलस्य रक्षणम् नूनं भवतु।
निर्मलं जलं संपादनीयम्
जल संरक्षणम् अनिवार्यम् ।
अभोजनेन जीवितुम भवेत
विना जलं तु सर्व हि नश्येत्।
किंचित् जलमपि पीतम्
दाहं कष्टं करोति दुरम् ।
शुष्कं तपनं हाहाकारः
जल संरक्षणम् परिहारकः।।
जलार्पणमस्तु......



# जलसाहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा

**श्री. संजय झेंडे आणि प्रा. योगेश भामरे**

**उद्घाटन समारोह**
**प्रमुख पाहुणे : डॉ. दि.मा.मोरे – कार्यक्रमाचे अध्यक्ष : डॉ. माधवराव चितळे**
**स्वागताध्यक्ष : श्री. रावसाहेब बढे**
**जलगौरव पुरस्काराचे मानकरी : आमदार श्री. कुणाल पाटील**
**मंडळाचे अध्यक्ष : डॉ. दत्ता देशकर**

जगात पाणी या विषयावर लक्ष देणाऱ्या कार्यक्रमाची सुरूवात २००२ पासून झाली. याच कालावधीत महाराष्ट्रात देखील पाण्याचे महत्व विचारात घेऊन मंथने होऊ लागली आहेत. देशात पाणी या विषयाला वैचारीक व व्यवहारीक उंची निर्माण होण्यासाठी संमेलन फायदेशीर ठरणारी आहेत.भविष्यात जो देश पाणी या घटकाला कुशलतेने हाताळू शकेल तोच देश विकासचा टप्पा गाठू शकतो असे प्रतिपादन जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी केले.

देशबंधू व मंजू गुप्ता फाऊंडेशन आणि भारतीय जल संस्कृती मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत अकराव्या जलसाहित्य संमेलनाचे उद्घाटन शनिवारी देशबंधू गुप्ता नगरीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव चितळे उपस्थित होते. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून दि.मा.मोरे, विदर्भ जलसिंचन विकास कार्यकारी संचालक अविनाश सुर्वे, आमदार कुणाल पाटील,प्रांताधिकारी गणेश मिसाळ, डॉ.धनंजय नेवाडकर, जल संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दत्ता देशकर, सचिव गजानन देशपांडे,स्वागताध्यक्ष रावसाहेब बढे, जिल्हाध्यक्ष प्राचार्य सर्जेराव भामरे,सचिव डॉ.संजय पी पाटील आदि उपस्थित होते.

प्रस्ताविक स्वागताध्यक्ष रावसाहेब बढे यांनी केले. ग्रामीण भारताच्या उभारणीचा दूरदृष्टीकोन ठेवून मा. देशबंधू गुप्ता यांनी देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनची स्थापना केली. गेल्या सात वर्षापासून देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनची धुळे जिल्ह्यात सिंचन, कृषी, पशुपालन, रोजगार , महिला स्वावलंबन इ. विविध विषयात कामगिरी बजावत आहे. खानदेशातील नैसर्गिक संस्कृती, समाज संस्कृती विशेषतः जलसंस्कृती वैविध्यपूर्ण आहे. भारताच्या प्रमुख नद्यांपैकी नर्मदा आणि तापी नदीचा प्रदेश म्हणून खानदेशकडे पाहिले जाते. याच खानदेशात धुळे जिल्हा नैसर्गिक दृष्ट्या संपन्न आहे.



लुपीन कंपनीच्या आणि देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनच्या मदतीने खानदेशात धुळे जिल्ह्यात लक्ष्य केंद्रीत केली आहे. मानव विकास निर्देशअंकानुसार हा जिल्हा तळाची आहे. जिल्ह्यात धुळे, साक्री, शिरपूर आणि खिंदखेडा या चार तालुक्यात ५७९ गावात काम उभारण्याचा संकल्प हाती घेवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे जलजागृती निर्माण करणे, शेतकऱ्याचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी फळ, फुल शेतीला प्रोत्साहन देणे.

अशा अनेक घटकाबरोबर देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनकाम करीत आहे. पाणी म्हणजे जीवन म्हणून पाण्याच्या व्यवस्थापनामुळे व नियोजनामुळे शेती संजीवनी मिळते. त्यामुळे गरीबीचे प्रमाण कमी होत जावून वास्तव्याच्या ठिकाणी रोजगार निर्माण करणे. अशी भूमिका देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनने स्वीकारली आहे. साक्री तालुक्यात पांझरा नदीवर अस्तित्वात फळसिंचन पध्दतीचा जिर्णोध्दार करण्याचे काम आम्ही स्वीकारले आहे.



११व्या जलसाहित्य संमेलनाविषयी भूमिका देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनचे मार्गदर्शक व भारतीय जलसंसकृती मंडळ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर यांनी मांडली. ११ व्या जलसाहित्य संमेलन खानदेशातील पांझरा नदीच्या काठावर धुळे नगरीत संपन्न होण्याचा मनस्वी आनंद व्यक्त करतांना पांझरा नदीच्या पुनरूज्जीवनासाठी आवाहन केले. पाण्याची व्याप्ती व तिव्रता दिवसेंदिवस वाढ असून हे समीकरण सोडविण्यासाठी लोक सहभाग, लोक बारीदरी, एनजीओ, संस्था स्थापना व शासन यांनी एकत्र येवून काम केल्यास पाण्यासारखी समस्या सोडणे अवघड नाही. भारतीय जलंसस्कृती मंडळाने यासाठी दर वर्षी राज्याच्या कान्याकोपऱ्यात लोकांना जागृती व्हावी म्हणून जलसाहित्य संमेलन आयोजित करते. आतापर्यंत विदर्भ , पश्चिम महाराष्ट्र, खानदेश असा यशस्वी प्रवास चालत आहे. जलविकासाला चालना देण्यासाठी सामाजातील विविध घटक काम करतांना दिसत आहे. धुळे जिल्ह्यात शिरपूर पॅटर्न फड पध्दती, देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन, जवाहर कृतज्ञता ट्रस्ट यासारख्या सेवा भावी संस्था तर वनमित्र वसंतराव ठाकरे बारीपाड्याचे शिल्पकार चैत्राम पवार, डॉ. धनंजय नेवाडकर यांचे कार्य जिल्ह्यात वाखाण्याजोगे आहे. २१ व्या शतकात पाणी हा घटक अतिशय गंभीर असून लोकांनी याच्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. असे मत देशकर यांनी मांडले.

११व्या जलसाहित्य संमेलनात जवाहर कृतज्ञता ट्रस्टचे मालक व धुळे ग्रामीणचे विद्यमान आमदार कुणाल पाटील यांना जलगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह व आहेर देवून पाणीदार आमदार अशा गौरवशाली उद्गाराने आमदार कुणाल पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार कुणाल पाटील यांनी भारतीय जलसंस्कृती मंडळ व देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन यांचे आभार व्यक्त करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. पाण्याचा विषय घेवून साहित्य संमेलन आयोजित केली जाताता हा वारसा आणि संस्कृती धुळे जिल्ह्याच्या येणारा काळ निश्चित सुजलाम् – सुफलाम् असेल असा विश्वास धुळे जिल्ह्याचा फड पध्दतीचा इतिहास मोठा आहे जवळ जवळ १९ बंधारे पांझरा नदीवर आहे. साक्री, धुळे, शिंदखेडा असा पांझरा नदीचा प्रवास व त्यावर फड पध्दतीचा प्रवास सिंचनाच्या बाबतीत गौरवशाली आहे.. परंतु या बंधाऱ्यात गाळ साचून बंद पडली आहे. भविष्यात मृत असलेली फड सिंचन पध्दतीला संजीवनी देण्याचे काम जवाहर कृतज्ञता ट्रस्ट करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला, ज्यामुळे जिल्ह्यात पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. ही फड सिंचन पध्दत संपूर्ण जगाला धुळे जिल्ह्याने दिली. या नदीवरील ठिकठिकाणचे काम आम्ही करणार आहोत आमच्या ट्रस्ट सिंचनाचे काम करीत असताना देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन वेळेवेळी मदत आणि सहकार्य मिळते. त्यामुळे आम्ही त्यांचे आभार व्यक्त करतो. धुळे तालुक्यात जलयुक्त शिवार नाल्याचे पुनरूज्जीवन करण्याचे काम हाती घेताना लोकांचा प्रतिसाद चांगला लाभला. दुष्काळग्रस्त धुळे जिल्ह्यात पाण्याविषयी जागृती करण्याचे कार्य त्यासाठी आयोजित केल्या जलसाहित्य संमेलनाला ३१ हजार रूपयांची देणगी देवून चांगल्या कामाला प्रोत्साहन देण्याचे काम आ. कुणाल पाटील यांनी स्वीकारले.




**पाण्याचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरवात :**

पाणी या प्रमुख विषयावर लक्ष केंद्रीत करुन जलसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्यामुळे संमेलनाचे उद्घाटन धुळे जिल्ह्यातुन विविध नद्यांच्या पाण्याचा कळस पूजन करुन करण्यात आले. यामुळे उपस्थितांमध्ये पाण्याचे महत्व पटावे हा उद्देश होता.

कार्यक्रमात बोलतांना दि.मा.मोरे यांनी सांगीतले की, देशातील सर्वात वंचीत घटक म्हणजे महिला आहेत महिलांचे सबलीकरण,दारिद्र्य पिचलेली जनतेला उभारी देणे आणि वंचीतांना आधार देणे दिशा देण्याचे काम



प्रत्येक समाजसेवकांनी केलेले आहे.आज सामाजीक संस्थानी देखील याच तीन घटकांवर लक्ष देण्याची आवश्यकता आहे.या वाटेवर सध्या मंजु गुप्ता फाऊंडेशन काम करीत आहे. देशात नऊ राज्यात, साडेतीन हजार गावांमध्ये सव्वा ते दिड कोटी जनतेच्या पुनरोत्थानासाठी मंजुगुप्ता फाऊंडेशनचे काम सुरु आहे. या माध्यमातुन देशाचे दारिद्र्य दुर होण्यास मदत होत आहे.केवळ शेतीवर देशाचे दारिद्र्य दुर होऊ शकत नाही. तर त्या करीता शेती सोबतच उद्योगाची जोड दिली पाहिजे ग्रामिण भागात उद्योग धंदे आणून ग्रामीण भागाचा चेहरा बदलण्याची आवश्यकता आहे. हे काम राजकीय व्यक्तीमत्वाने केले ग्रामिण चेहरा बदलु शकतो. प्रत्येक राजकाणी व्यक्तीने राजकारणासाठी राजकारण न करता समाजकारणासाठी राजकारण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगीतले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. माधवराव चितळे यांनी पाण्याबाबत व्यावहारिक व वैचारिक भूमिका व्यक्त करून जलसाहित्य संमेलनाची मालिका जे काम करीत आहे ते गौरवशाली आहे. जगात आय.आय.टी चा बोलबाला असून त्यांनी एकत्र येवून वैचारिक मंथन व्हावे या विषयी येथे पाण्यावर चर्चा करणे जलसाहित्य परिषद आयोजित केली. ही परिषद २००२ पासून पाण्यावर काम करीत आहे. सध्या विकासाचा दर हा ७.८ टक्के दिसून येतो. विद्यार्थी पदवी व पदयुत्तर शिक्षण घेवून बाहेर पडतो तेव्हा विकास होतो परंतु त्या सोबतच कृषी क्षेत्रात विकास होणे कृषी प्रधान देशासाठी महत्वाचे असते. पाच कोटी टन धान्य उत्पादन करणारा देश आज ३२ कोटी टन धान्य निर्माण करतो. ही गोष्ट देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्व आहे. जगाचे वार्षिक उत्पन्न १५ हजार डॉलर व आपल्या देशाचे १ हजार डॉलर ही दरी खूप जास्त आहे. त्यासाठी कृषी क्षेत्राला नवीन आकार देण्याची गरज आहे. असे कृषी क्षेत्र जीवंत ठेवण्यासाठी पाण्याचे नियोजन, व्यवस्थापन करणे हे आवाहन भारतीयांसमोर आहे. तरच आपण विश्वात शोभूनी राहो या ओळी प्रमाणे जगात टिकून राहून पुढच्या पिढीला हे चित्र बदलण्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल. त्यासाठी धुळ्यामध्ये संपन्न होणारे जलसाहित्य संमेलन प्रेरक ठरणारी आहे. अशी भूमिका व मत जलसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. माधवराव चितळे यांनी प्रतिपादीत केले.



**माननीय सरेश प्रभू व श्री. सीताराम गुप्ता यांचे संदेश :**

वाणिज्य मंत्री सुरेश प्रभु यांनी साहित्य संमेलनाला व्हिडीओच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या त्यांनी सांगितले की,जल व वनांचे साहित्यिकांना कायमच आकर्षण राहिले आहे. या संमेलनातून मांडण्यात येणाऱ्या विचारातुन जलसंवर्धनाला चालना मिळणार आहे.या मुळे निश्चीतच जलनियोजनाला फायदा होईल. यावेळी लुपिन फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक सिताराम गुप्ता यांनी व्हीडीओ व्दारे शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगीतले की,पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. भारतात जगाच्या १७ टक्के लोकसंख्या राहते तर पृथ्वीवरील पाण्याच्या तुलनेत फक्त चार टक्के वापरा लायक पाणी भारतात आहे. या बाबीचा विचार करुन जलसंवर्धन ही काळाची गरज आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात जलसिंचनाचे प्रमाण कमीच आहे.या संमेलनातून व्यक्त होणारे विचार हे राज्य व केंद्र शासनाला सहाय्यभूत ठरणारे असल्याचे त्यांनी सांगीतले.

**द्रष्टे एमव्ही पुस्तकाचे प्रकाशन :**

सर विश्वेश्वरैय्या यांचे स्थापत्य क्षेत्रातील विशेष कार्य राहिले आहे. त्यांचा धुळे जिल्ह्यातील केलेल्या काम आज ही अभियंत्यासाठी प्रेरणादायी आहे. सर विश्वेश्वरैय्या या बहुआयामी व्यक्तींच्या जीवनातील विविध पैलुंवर प्रकाश टाकणारे पुस्तक स्वर्गीय मुकुंद धाराशिवकर यांनी लिहले आहे.या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले.या वेळी मिरा धाराशिवकर, गांधार धाराशिवकर उपस्थित होते.या वेळी गांधार धाराशिवकर यांनी पुस्तकातील विविध पैलु संदर्भात माहिती दिली.त्यांनी सांगीतले की, सर विश्वेश्वरय्या एक अभियंता म्हणून सर्व परिचीत आहेत.मात्र त्यांच्या जीवनाचे विविध अंगाची माहिती द्रष्ट एम.व्ही या पुस्तकात मांडण्यात आले आहेत. हे फक्त व्यक्तीचित्रण नसून विश्वश्वरय्या यांच्या कार्यशैली मांडण्यात आलेली आहे.

**स्मरणीका प्रकाशन :**

अकराव्या जलसाहित्य संमेलनाच्या निमीत्ताने स्मरणीकेचे प्रकाशन करण्यात आले. डॉ.दत्ता देशकर, पत्रकार संजय झेंडे, सुनिल सैंदाणे संपादीत या स्मरणीकेत खानदेशातील जल क्रांतीवर प्रकाश टाकणारे अभ्यासपूर्ण लेखन मांडण्यात आले आहे. पाणी या विषयाच्या



अनुषंगाने विविध पैलूवर प्रकाश टाकण्यात आलेला असून संग्रही ठेवण्या योग्य स्मरणीका प्रकाशीत करण्यात आली.

**जलदिंडीने वेधले लक्ष :**

साहित्य संमेलनाच्या निमीत्ताने शहरातून सकाळी जलदिंडी काढण्यात आली. जलदिंडीची सुरवात जयहिंद हायस्कुल पासून करण्यात आली.धुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या विविध नद्यांचे पाण्याचा



कळस पालखीत ठेऊन दिंडी काढण्यात आली. या दिंडीत शाळकरी व महाविद्यलयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिंडी जयहिंद हायस्कुल पासून,इंदिरा गार्डन, आदर्श कॉलनी या मार्गाने निघाली वेदांत मंगल कार्यालया जवळ जलदिंडीचा समारोप करण्यात आला.

**जलसाहित्य संमेलन ऑनलाईन :**

जल साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याची इच्छा असतांना काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहु न शकलेल्यां जलप्रेमींसाठी ऑनलाईन जलसाहित्याची व्यवस्था देखील करण्यात Ambr.Www.cbpindia.com या संकेतस्थळावर नोंदणी करुन दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे ऑनलाईन दर्शन होणार आहे.

**विविध स्टॉलने वेधले लक्ष :**

साहित्य संमेलनाच्या निमीत्ताने जलसंवर्धनावर काम करणाऱ्या विविध घटकांचे स्टॉल लावण्यात आले.त्यात पाणी फाऊंडेशन, जैन इरिगेशन, इसेंशियल इक्विपमेंट, पारंपारिक उर्जास्त्रोत, देशबंधु आणि मंजुगुप्ता फाऊंडेशन आदिचे स्टॉल या ठिकाणी लावण्यात आली. साहित्य संमेलनातील साहित्याच्या मेजवानी बरोबरच नागरीकांना या स्टॉलच्या माध्यमातुन जलसंवर्धनाच्या बाबतीत माहिती व उध्दबोधन करण्यात येत होते.

**खानदेशात तिसऱ्यांदा आयोजन :**

आता पर्यंत राज्यभर दहा जलसाहित्य संमेलन झाली आहेत. त्यात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेशात प्रत्येकी दोन वेळेस साहित्य संमेलन झाली.खानदेशात या पूर्वी जळगाव आणि नाशिक येथे साहित्य संमेलन झाले.तिसऱ्या टप्प्यात पहिलाच मान धुळे जिल्ह्याला मिळाला आहे.

*****



# देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशनचे जल क्षेत्रातील कार्य

**श्री. सुनील सैंदाणे, धुळे**

**सत्राचे अध्यक्ष : श्री. रावसाहेब बढे**
**वक्ते : श्री. योगेश राऊत**
**श्री. जितेंद्र सोनवणे**

दिनांक २० आणि २१ जानेवारी २०१८ रोजी देश बंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन आयोजित ११ वे जल साहित्य संमेलन धुळे येथे पार पडले. भारतीय जल संस्कृती मंडळ गेल्या १० वर्षांपासुन असे संमेलन महाराष्ट्रातील विविध भागात घेत आहे. जल साहित्य, जल स्थापत्य, जल कायदा, पर्यावरण, जल साक्षरता आणि कविसंमेलन असे विविध पैलू यात अभ्यासले गेले. यंदा च्या साहित्य संमेलनात देश बंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन चे कार्य, जल संधारणातील गट सिंचन विहीर यासंदर्भात संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. योगेश राऊत यांनी केले व विविध बंधारे योजनांद्वारे झालेला सिंचन विकास ही संकल्पना व झालेले कार्य संस्थेचे प्रतिनिधी श्री. जितेंद्र सोनवणे यांनी स्पष्ट केली.




श्री. राऊत यांनी मांडले कि **लुपिन लि.** या औषधीनिर्माण क्षेत्रातील आंतरराष्ट्रीयस्तरावरील उद्योगसमुहाशी निगडित असलेला डॉ. देशबंधू गुप्ता यांनी स्थापन केलेल्या **देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन** या संस्थेची स्थापन १ नोव्हेंबर २०१० रोजी केली. धुळे जिल्ह्यात गरीबी मुक्त, रोजगार युक्त आणि महिला सशक्त जिल्ह्याच्या निर्मितीचे स्वप्न **चेंज इंडिया प्रोग्राम** च्या माध्यमातून संस्था राबवीत आहे. दारिद्र रेषेखालील कुटुंबांच्या शाश्वत विकासासाठी संस्थेमार्फत गेल्या सात वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांकामांचे दृष्य परिणाम आज दिसू लागले आहे. दारिद्र्य रेषेखालील काही आदिवासी कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये झालेले परिवर्तन या प्रयत्नांची साक्ष देते. धुळे जिल्ह्यातील साक्री, धुळे, शिरपूर आणि शिंदखेडा या चार तालुक्यांतील ५७९ गावांतून काम उभे केले आहे. शेतीच्या प्रगतीसाठी शेतकऱ्यांना समग्र मार्गदर्शन करणे, त्यांच्यासाठी जागृती कार्यक्रम घेणे, शेतीतील चांगले प्रयोग दाखविण्यासाठी शेतकऱ्यांना विविध ठिकाणी प्रकल्प भेटी, शेतकऱ्यांचा आर्थिकस्तर वाढविण्यासाठी फळबाग शेतीला प्रोत्साहन देणे आदि उपक्रम फाउंडेशनतर्फे हाती घेतले जातात. **नाबार्ड** च्या सहकार्याने शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करण्यात आली आहे. त्याचा लाभ हजारो शेतकऱ्यांना झालेला दिसतो. गरजू शेतकऱ्यांना शेतीसाहित्याचे वाटप करण्यासाठी या संस्थेने पुढाकार घेतला आहे. शेतीविकासामध्ये मूलभूत



भूमिका बजावणाऱ्या पाणी या घटकाकडे गुप्ता फाउंडेशनतर्फे विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. आदिवासी क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील शेतकऱ्यांसाठी सामुदायिक विहिरींची संकल्पना अस्तित्वात आणण्यात आली आहे. या विहिरींची निर्मिती लाभदायी ठरल्याची प्रचिती संबंधित लाभार्थींच्या चेहऱ्यावरील हास्य पाहिले की येते. पशुधन विकासाच्या क्षेत्रात देखील प्रतिष्ठानचे काम आहे. याशिवाय उद्योजकता विकासासाठी विविध उपक्रम अमलात आणत असतानाच ग्रामीण भागात आरोग्य सुविधा पोहोचविण्यासाठी फिरता दवाखानाचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. एक्सरे, ईसीजीसह सर्व प्रकारची नियमित आरोग्य तपासणी अत्यंत माफक दरात करण्यात येते. महिला सबलीकरणासाठी बचत गट संकल्पनेचा यथार्थ वापर करण्यात आलेला दिसतो. आधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित असलेल्या ग्रामीण आदिवासी भागातील युवकांसाठी ई लर्निंग, कॉम्प्युटर लॅब, करिअर मार्गदर्शन केंद्र, कार्यान्वित करण्यात आले आहे.

गट शेतीचे एक उत्तम उदाहरण गट विहीर प्रकल्प आहे. ४ ते ५ शेतकऱ्यांचा समूह तयार करून गट विहीर संकल्पना संस्था राबवीत आहे. याअंतर्गत १८३ गट विहीरी बांधण्यात आल्या असून ८८३ शेतकऱ्यांना सिंचनासाठी थेट पाणी उपलब्ध झाले आहे.

श्री जितेंद्र सोनवणे यांनी विविध बंधारे योजनांद्वारे झालेला सिंचन विकास हि संकल्पना मांडताना सांगितले की, भारत परिवर्तन कार्यक्रमांतर्गत जल व मृदा संधारण क्षेत्रात देखील संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेने आज पर्यंत २१० सिमेंट बंधारे बनविणे, ११० ठिकाणी २२.४३ कि.मी. लांबीचे नाला खोलीकरण व रुंदीकरण केले आहे. या कामांमुळे एकूण ७ नदी/नाले व इतर ठिकाणी काम करून १२२ कि.मी. लांबीवर नदी  पुनर्जीवन करण्यात आले आहे. यामुळे सुमारे १५००० एकर क्षेत्र सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे.

लघु उपसा सिंचनांतर्गत संस्थेने १३९२ शेतकर्यांना लाभ झाला आहे. यात सिंचनासाठी पाईप, मोटर, डीझेल पंप इ. साहित्य पुरविण्यात आले. तसेच पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी ठिबक सिंचनाद्वारे २७६ शेतकऱ्यांच्या १२१ एकर क्षेत्रावर प्रात्यक्षिक करण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्यातील जलयुक्त शिवार समितीचे सदस्यत्व देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन ला २०१४ पासून आहे. संस्थेने आजपर्यंत शिंदखेडा, साक्री आणि धुळे तालुक्यात सक्रीय सहभाग नोंदविला आहे. संस्थेने रु. २३८.७५ लक्ष इतका निधी खर्च केला आहे. संस्थेला शिर्डी संस्थान यांच्याकडून रु. ४२.०० लक्ष इतका निधी सहभाग म्हणून मिळाला आहे.

२०१४–१५ शिंदखेडा तालुक्यात ११ व साक्री तालुक्यात १ नाला खोलीकरण व सिमेंट बंधारा दुरुस्तीची कामे करण्यात आली. तसेच २०१५–१६ शिंदखेडा तालुक्यात १४ व साक्री तालुक्यात २ नाला खोलीकरण व सिमेंट बंधारा दुरुस्तीची कामे करण्यात आली. आणि चालू वर्षात धुळे तालुक्यात २० नाला खोलीकरण व सिमेंट बंधारा दुरुस्तीची कामे करण्यात आली.

संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची जनजागृती विविध प्रकारे करण्यात येते. यात गाव बैठका, जनजागृती सभा, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रात्यक्षिके, कलापथके, मेळावे, शिवारफेरी, तसेच स्थानिक वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, त्रैमासिक, चित्रफित, माहितीफलाकांचा वापर संस्थेमार्फत केला जातो, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

नदी खोरे विकास मॉडेल: कोरड्या झालेल्या बारमाही नद्या पुन्हा पुनरूज्जीवित करण्यासाठी उगमापासून ते संगमापर्यंत बांध–




बंधीस्ती करून नदीच्या खोऱ्यांचे पुनर्जीवन करताना कान नदी, जामखेली नदी, पान नदी, सूर नदी, मदारीनाला, वाघी नाला या नद्यांच्या क्षेत्रात बांध बंधीस्ती करून त्यांचे पुनर्जीवन करण्यात आले. आज एकूण ९०८८ एकर शेती क्षेत्रास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा झाला आहे.   तसेच संस्थेने आज पर्यंत २१० सिमेंट बंधारे बांधून, ११० ठिकाणी २२.४३ कि.मी. लांबीचे नाला खोलीकरण व रुंदीकरण केले आहे.



# जलयुक्त शिवार योजनेचे यशापयश

**प्रा. जगदीश अमृतराव कुवर**

**अध्यक्ष : डॉ. दि.मा. मोरे**
**वक्ते : श्री. इरफान शेख, श्री. रमाकांत कुलकर्णी**
**डॉ. नारायणपेटकर, श्री. सतीश खाडे**

**पाणी फाउंडेशन मधील लोकसहभाग – श्री. इरफान शेख :**

११ वे जल साहित्य संमेलनाच्या तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष दि.मा. मोरे होते. श्री. इरफान शेख यांनी पाणी फाउंडेशनमधील लोकसहभाग कसा मिळवला दुष्काळातून समृध्दीकडे कसे जाता येईल याचा मूलमंत्र दिला.

श्री. इरफान शेख यांनी पाणी विषयावर बोलत असतांना देशात, राज्यात, गावात पाणी विषयावर संघर्ष सुरू आहेत. जिथे जलसिंचन प्रकल्प उभारले जातात तोच भाग जास्त पाण्याचा वापर करत आहे. पण जर प्रत्यक्षात शाश्वत विकास साध्य करायचा असेल तर यासाठी पाणी फाउंडेशन काम करेल.




महाराष्ट्राला दुष्काळमुक्त बनविण्यासाठी अमिर खान आणि किरण राव यांनी २०१६ साली स्थापन केलेली पाणी फाउंडेशन ही एक ना नफा – ना तोटी तत्वावर काम करणारी कंपनी आहे. पाणी फाउंडेशन मध्ये सत्यमेव जयते च्या कोअर टिमचा समावेश आहे. प्रत्येक गावाचा विकास कसा करता येईस याविषयी पाणी फाउंडेशन काम करणार आहे. दुष्काळातून समृध्दीकडे जाण्यासाठी पाणी फाउंडेशन तीन प्रमुख घटकांवर ठोस काम करणार आहे.

**१. प्रेरणा :**

लोकांना याची खात्री पटायला हवी की स्थानिक पातळीवर, गावपातळीवर पावसाचे पाणी वाचवणे हा जलसुरक्षिततेचा एक मार्ग आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात अशी मानसिकता असली पाहिजे की हे काम मी सहज आणि हसत खेळत पार पाडेन.

**२. प्रशिक्षण :**

पाणी फाउंडेशन गावातील प्रत्येक पाच लोकांना पाणलोट व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणार. आणि या संपूर्ण प्रक्रियेत जवळपास अडीच लाख (२.५ लाख) लोक प्रशिक्षण पूर्ण करतील.

**३. जलसाक्षरतेचे व्यासपीठ :**

पाणी फाउंडेशन एक आधुनिक व्यासपीठ निर्माण करेल की ज्यामुळ लोकांना माहिती मिळेल. पाणी फाउंडेशन कोणालाही पैसे देत नाही. ही एक ना नफा – ना तोटा तत्वावर काम करणारी कंपनी आहे. सरकारमार्फत मिळणारी रक्कम व सरकारसोबत जोडले जाणे स्वयंसेवकासोबत जोडले जाणे, मार्गशर्दक ज्ञानांचा फायदा घेणे अशा

पध्दतीने पाणी फाउंडेशन काम करत आहे.

**सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा २०१८ :**

श्री. इरफान शेख सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेविषयक बोलतांना ते म्हणाले – स्पर्धेच्या काळात जलसंधारण आणि पाणलोट व्यवस्थापनाची उत्तम कामगिरी करण्यासाठी वेगवेगळ्या गावात आता स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेचा कालावधी ८ एप्रिल २०१८ ते २२ मे २०१८ असा आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. स्पर्धेत विजेत्यांना प्रथम क्रमांकाचे बक्षिस रूपये ७५ लाख, दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस ५० लाख आणि तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस ४० लाख रूपये आहे. या स्पर्धेत सर्व गावांनी आपला सहभाग नोंदविण्यासाठी www.panifoundation.com या संकेतस्थळावर जावून नोंदणी करण्याचे आवाहन केले.



**पाणलोट क्षेत्राचे विज्ञान :**

पाणलोट क्षेत्राचे विज्ञान या विषयावर बोलतांना इरफान शेख म्हणतात की, लोकांना पाणी संवर्धनाचे महत्व प्रशिक्षणाच्या माध्यमातून पटवून दिले. गावपातळीवर जलसाक्षरता आता हळूहळू निर्माण होत आहे. विज्ञानाचा प्रत्यक्षरित्या वापर केला जात आहे. गावपातळीवर सर्व लोकांना यावर अपार मेहनत घेतली आहे. पाणी फाउंडेशनचा असा विश्वास आहे की पाणलोट व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण व पावसाच्या पाण्याचे नियोजन या करीता लोकांना जागृत करणे, प्रशिक्षित करणे महत्वाचे आहे.


जनसहभागातून गावातील लोकांच्या सहभागातून कामे करून घेतली जातात. समाजातील सर्व महिला, लोक यांनी काम करण्यास होकार दर्शविला, दिवसभर काम करत विकासाची कामे जलद होत आहे. शासनानेही मदत केली आहे. इतकेच नव्हे तर भारतीय जैन संघटनेने ७५००० JCB मशीन यासाठी उपलब्ध करून दिले. समाजात श्रमदानासाठी कालावधी ४५ दिवसांचा आहे. लोकसहभागातून पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून हे काम जलद गतीने पुढे जात आहे.

**लोकसहभागातून कसून प्रयत्न – रमाकांत कुलकर्णी :**

या सत्रात लोकसहभागातून कसून प्रयत्न कसा सार्थ ठरतो याचे वास्तव परिस्थिती, सरकारी योजनेत त्यांचा समावेश करून गावपातळीपर्यंत ही रचना कशी काम करेल याची सविस्तर माहिती रमाकांत कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात सांगितली.



सरकारतर्फे एक वेगळा प्रयोग राबविला जात आहे. जलसाक्षरता संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण व्हावी असा मानस समोर ठेवून सरकारी यंत्रणेत याचा समावेश करून विकासाची कामे जलद गतीने होतील यासाठी वेळोवेळी प्रशिक्षणाच्या माध्यमातून सखोल माहिती दिली जाणार. लोकसहभागातून जलनायक ते जलसेवकाची कामाची सुत्रता सांगतांना ते म्हणाले की याची रचना ही राज्यपातळीवर + विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर आणि गावपातळीवर काम करेल. त्यासाठी स्वयंसेवाकाची एक संरचनाकात्मक फळी तयार केली आहे.




ही स्वयंसेवी संरचनात्मरक फळी आहे. हे सर्व काम करत असतांना कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जाणार नाही. हे काम फक्त लोकसहभागातून केले जाणार. संपूर्ण महाराष्ट्रभर राज्यपातळीवर जलनायक म्हणून ते गावपातळीपर्यंत स्वयंसेवक आपली भूमिका पार पाडणार आहे. विशेष म्हणजे सरकारी खात्यात याची जोडणी केल्याने विकास कामांना जलद गती मिळेल, लोकांपर्यंत काम पोहचणे, जलजागृती होणे असा मानस समोर ठेवून जलसाक्षर, जलसंपन्न महाराष्ट्रात असे स्वयंसेवक निर्माण होतील. हे प्रत्येक स्तरावर जलनायक, जलयोध्दा, जलप्रेमी, जलदूत, जलसेवक अशी भूमिका पार पाडणार आहेत.



**श्री. श्री. रविशंकर यांचे जलसंधारण कार्य – डॉ. नारायण पेटकर, सोलापूर :**

नदी पुनरुज्जीवन सहभाग या विषयावर डॉ. नारायण पेटकर बोलत असतांना ते म्हणाले, आज पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. व्यासपीठावरून बोलत असतांना त्यांनी हजारो युवकांना पाण्यासंबंधी काम करण्याचे अवाहन केले. देशातील युकवांनी स्वयंप्रेरणेने आपण पाणी प्रश्नाविषयी वेगवगेळ्या स्तरावर कामे केली पाहिजे. भारतात पावसाचे प्रमाण निश्चित स्वरूपाचे असते. असे असतांना पाण्याची कमतरका निर्माण होवू नये म्हणून प्रयत्न केले पाहिजे. डॉ. नारायण पेटकर आर्ट ऑफ लिव्हिंग तर्फे करण्यात आलेली विकास कामांपैकी नदी पुनरूज्जीवनचे काम सुरू करण्यात आले. आज महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, छत्तीसगढ या सहा राज्यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग तर्फे काम सुरू केले आहे. केरळ आणि तामिळनाडू जिल्ह्यातील कामाला सुरूवात झाली आहे. महाराष्ट्राचा विचार केला असता महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांतील ३० गावात जल संधारणाची कामे केली जात आहे. असे करत असतांना त्याला भूशास्त्रीय आधार घेणे महत्वाचे असते , त्यासाठी एक स्वतंत्र विभाग नेमण्यात आला आहे. त्यात एका भूवैज्ञानिकाची नेमणूक करण्यात आली आहे. जलसंधारणाचे कार्य करत असतांना पाण्याचे पुनर्भरण कोणत्या स्तरापर्यंत करावे लागेल त्याची किमान खोली किती असावी याचे परीक्षण केले जाते.

भारत देशाचा विचार केला असता भारतात सर्वत्र पावसाचे असमान प्रमाण आहे. असे असतांना भारतात पाण्याची कमतरता जाणवते. याचे कारण म्हणजे हवामान, वाहते पाणी, भूर्गभातील पाण्याचे पुनर्भरण होत नाही अशा अनेक कारणांमुळे आज पाण्याचा प्रश्न फार गंभीर समस्या बनली आहे.

हे सर्व पाणी , जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यासाठी जमिनीचे Analysis करणे महत्वाचे असते. ज्या ठिकाणी पाणी झिरण्याची क्षमता जास्त आहे अशी ठिकाणे शोधून काढली जातात. त्याची योग्य क्षमता आहे का व या सर्व प्रश्नांची वैज्ञानीक दृष्टीने शोध घेतला जातो. त्या पध्दतीने काम करण्यास सुरूवात केली जाते. शाश्वत विकासाचा विचार करतांना पुढे काय करावे लागेल याचा अभ्यास करणे फार गरजेचे आहे. आज तंत्रज्ञानाचा अमाप विकास, प्रसार झाला आहे. जमिनीचे परीक्षण करणे, भूवैज्ञानि पध्दतीने नियोजबध्द स्वरूपात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वनसंधारण करणे, जल संधारण करणे, पिक व्यवस्थापन करणे या सर्व गोष्टींचा अंतर्भाव करून ते पूर्ण केले जाईल.

**रोटरीचे जलसंधारणातील कार्य – सतीश खाडे :**

रोटरीचे जलसंधरणात मोलाची भूमिका आहे. हे पटवून देतांना मा. सतीश खाडे यांनी जल संधारणाच्या कामात जनसमुदायाचा लोकसहभाग महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात लोकांची भूमिका बदलणे गरजेचे आहे. पाणी समस्येचे गांभीर्य पाहता पाण्याचा योग्य पध्दतीने वापर झाला पाहिजे. रोटरीच्या माध्यमातून आज अनेक जलसंवर्धनाची कामे हाती घेतली जातात व त्याला तंत्रज्ञानाची जोड दिली जाते.



आज रोटरीकडे जागतिक स्तरावर एक मंच आहे. त्यातून सामाजिक कल्याण करणे, रोटरी ही देशपातळी बरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करते. लाखो करोडोचा निधी विकासासाठी लावला जातो. शिक्षण, आरोग्य, पाणी या क्षेत्रात रोटरी क्लब काम करते. जलसंधारणासाठी यांना वॉटर बँक ही संकल्पना मांडली. विदेशातील नाविन्यपूर्ण अत्याधुनिक तंत्रज्ञान देशात आणते, जसंधारणाचे काम जिल्हा पातळीवर रोटरी कसे करते यावर ते म्हणतात की, ४ ते ५ जिल्हे मिळून रोटरीस्थापन केली जाते. आणि त्या मार्फत रोटरीकडे असलेला जागतिक मंच फायद्याचा ठरतो. गोवा राज्याचे उदाहरण देत ते म्हणाले, गोव्यात ५४ बोरवेलचे पुनरूज्जीवन करण्यत आले. पाण्याचे पुनरुज्जीवन करण्यास नवीन मशीन घेतली त्याद्वारे जवळपास ८७ गावांमध्ये जलसंधारणाचे काम केले गेले. सुमारे २७ गावे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाली आहेत. पुणे जिल्ह्यात जवळपास २०००० गावात शोषखड्डे तयार केले त्यामुळे रोगराई कमी होवून पाण्याच्या पातळीत वाढ झाली. अतिशय आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे रोटरी आज जलंधारण क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. जनतेचे लक्ष वेधण्यासाठी आज रोटरीमार्फत रोटरी अवॉर्डस् सुरू करण्यात आले आहे. आज लोकांना तंत्रज्ञान देवून त्यांच्या गरजा जाणून घेतल्या पाहिजेत. आज रोटरीमार्फत रोटरी वॉटर ऑलंम्पियाड स्पर्धेचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर सुरू झाले व विजेत्याला ३० ते ३५ लाखापर्यंत बक्षीस दिले जाते. लोकजागृती झालीच पाहिजे त्यातून जलसंधारणाचे महत्व लोकांपर्यंत खऱ्या अर्थाने पोहचेल आणि रोटरी त्यासाठी सदैव कार्य करण्यास तत्पर आहे.

*****

## जलसंवाद मासिकाने प्रकाशित केलेले पाणी विषयक विशेषांक



१. पाणी आणि महिला
२. पाणी आणि संस्कृती
३. नदीजोड प्रकल्प
४. पाण्याचे प्रदूषण
५. पाण्याचे दर
६. पाण्याची गुणवत्ता
७. पाणी वितरण संस्था
८. पाण्याचे खाजगीकरण
९. पाणी आणि अन्न सुरक्षा
१०. भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या
११. पाणी आणि विद्युत
१२. स्टॉकहोम पुरस्काराचे मानकरी
१३. तिसरे जल साहित्य संमेलन विशेषांक
१४. पाचवे जल साहित्य संमेलन
१५. सहावे जल साहित्य संमेलन-चंद्रपूर
१६. सातवे जल साहित्य संमेलन-नांदेड
१७. भूजल विशेषांक
१८. पाणी आणि शेतक-यांच्या आत्महत्या
१९. प्रश्न पिण्याच्या पाण्याचा
२०. कडधान्ये व गळीत धान्याचे सिंचन व्यवस्थापन
२१. आठवी सिंचन परिषद, वर्धा विशेषांक
२२. जलपुनर्भरण विशेषांक
२३. पारंपारिक जलव्यवस्थापन विशेषांक
२४. प्रदीप चिटगोपेकर स्मृती विशेषांक
२५. जलकार्यकर्ता परिचय विशेषांक
२६. आठवे जलसाहित्य संमेलन-कोल्हापूर
२७. नववे जलसाहित्य संमेलन -औरंगाबाद
२८. दहावे जलसाहित्य संमेलन-चिपळूण
२९. रोटरीचे चक्र जलचक्र बनते तेव्हा
३०. विदर्भ स्तरीय पाणी वापर संस्था- कार्यशाळा, मोझरी (जिल्हाः अमरावती)

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करून देणारे मासिक
संपादक
डॉ. दत्ता देशकर

३१. मराठवाड्यातील औद्योगिकरण आणि पाणी
३२. सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशऩ शतकोत्सव विशेषांक
३३. गोदावरी नदीच्या पाण्याचे समन्यायी पाणी वाटप
३४. डॉ. माधवराव चितळे गौरव विशेषांक
३५. श्री. मुकुंद धाराशिवकर स्मृती विशेषांक
३६. शुष्क नद्यांचे आक्रोश विशेषांक
३७. अविश्रांत ७५-डॉ. दत्ता देशकर
३८. पाणी आणि शाश्वत आर्थिक विकास
३९. कचरा व्यवस्थापन विशेषांक
४०. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन विशेषांक

## आम्ही वर्गणीदार होणार

| | | |
|---|---|---|
| वार्षिक | (रु.५००) | ☐ |
| पंचवार्षिक | (रु.२०००) | ☐ |
| दशवार्षिक | (रु.३५००) | ☐ |

माझा पत्ता ____________________

____________________

____________________

पिन कोड __________ मोबाईल __________

(वर्गणी मनीऑर्डरने/चेकने/डिमांड ड्राफ्टने स्विकारली जाईल)

बँकेत परस्पर भरणा करायचा असल्यासः
खात्याचे नावः जलसंवाद
बँकेचे नावः जनता सहकारी बँक, बाणेर शाखा, पुणे
खाते क्रमांकः 040230100000037
IFSC कोडः JSBP0000040

जलसंवाद मासिक
ए - २०१ मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर, पुणे - ४११ ०४५

# खानदेशची जलसंस्कृती

**प्रा. योगेश भामरे**
**मो.९४२१४३९७०१**

**सत्राचे अध्यक्ष : डॉ. सर्जेराव भामरे**
**वक्ते : डॉ. जितेंद्र तलवारे, श्री. मोतीरामजी पाटील**
**डॉ. धनंजय नेवाडकर, श्रीमती सरला भिरड**
**डॉ. विवेक चौधरी, श्री. वसंतराव ठाकरे**

खानदेशची जलसंस्कृती ही राज्यात व राज्याच्या विकासात मोलाची ठरते. हीच भूमिका खानदेशच्या विकासाला उत्तेजन देते. २००२ साली स्थापन झाल्या भारतीय जलसंस्कृती मंडळाचे कार्य खानदेशच्या विकासात विशेषत: पाण्याचे प्रश्न जलसाक्षरता, जल जतन, संवर्धन या क्षेत्रात मोलाचे ठरते. खानदेशच्या पाणी विकासात कै. डॉ. मुकुंद धाराशिवकर यांनी जल साक्षरतेला जे बळ दिले त्यावर डॉ. जितेंद्र तलवारे यांनी प्रकाश टाकला. डॉ. तलवारे यांचा आणि धाराशिवकर यांची पाणी अभियानात ओळख होवून एकत्र काम करण्याची संधी प्राप्त झाली. डॉ. जितेंद्र तलवारे यांनी धाराशिवकरांच्या विचारांना पुष्टी देत त्यांच्या विषयी अभिमान व गौरवोद्गार काढले. मुकुंद धाराशिवकर हे एक विलक्षण व्यक्तिमत्व होते. प्रसिध्द इंजिनिअर ,लेखक, कुशल संघटक, व सच्चेसमाज प्रेमी होते. श्री. धाराशिवकर यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात ३८ वर्षे काम केले. दादा हे भारतीय जलसंस्कृती मंडळ महाराष्ट्राचे उपाध्यक्ष होते. त्यांनी आतापर्यंत २७ वी पुस्तके लिहिली. त्यात ५ कादंबऱ्या. १० पाणी या विषयावर पुस्तके व इतर पुस्तकांची निर्मिती त्यांनी केली. पाणी तुमचे आमचे या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पंजाबराव देशमुख पुरस्कार मिळाला. ऑपरेशन भगिरथी या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. समर्थ धुळे जिल्हा २०२० वेद उद्याचा प्रगतीच्या पाऊल वाटा, भाग – एक आणि दोन व आताच प्रकाशित झाले . सर विश्वैशवरय्या हे पुस्तक त्यांच्या दूरदृष्टीतून निर्माण झाले.




धुळे जिल्ह्यात समतोल विकास व्हावा. अशी मुकुंदरावांची इच्छा होती. त्यासाठी प्रेझेंटेशन त्यांनी तयार केले, विविध नद्यांचा स्त्रोत काय, त्यांची जीवन शैली काय याचा अभ्यास दादांनी केला. स्वता:च्या घरामध्येच प्रयोगशाळा सुरू केली. मोबाईल व्हॅन ही फिरती प्रयोगशाळा निर्माण करून संपूर्ण जिल्ह्यात बाल विज्ञान स्पर्धा सुरू केली. त्यामुळेच महाराष्ट्र धुळे जिल्ह्याचे नाव गौरवाने घेतले गेले. वाचन वेडा माणूस म्हणून दादांचा



परिचय संपूर्ण महाराष्ट्रात होता. धुळे जिल्हा हा पाण्याच्या बाबत सधन व साक्षर व्हावा अशी दादांचीइच्छा होती, न थांबता, अविरत परिश्रम करणे हे एक ध्येय मानून दादांनी समाजात कार्य केले. पाण्याचे जतन व संवर्धन करायचे असेल तर लोकसहभागाशिवाय पर्याय नाही असे ठाम मत दादा व्यक्त करीत असत. भारतीय जलसंस्कृती मंडळ स्थापन झाल्यापासून दादांनी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षकांना सोबत घेवून पाणी व्यवस्थापनाचे प्रयोग केले. दादांनी चार हजार पुस्तकांचा संग्रह करून जास्तीतजास्त पुस्तक पाण्यावर असून ती वाचण्यासाठी खुली केली. दादांनी महाराष्ट्राला जलसंपन्न करण्याचा मानस बाळगला होता, हे काम अविरत चालत होते परंतु १३ फेब्रुवारी २०१६ ला दादा हे जग सोडून आपल्यातून चालले गेले. दादा जरी शरीर स्वरूपाने आपल्यात नसले तरी मानसिक दृष्ट्या ते आपल्या सोबत कायम काम करित आहे. याचे उदाहरण म्हणजे सध्या संपन्न ११ वे जलसाहित्य संमेलन होय.

मोतीराम पाटील यांनी शहादा तालुक्यात जलसाक्षरतेचा अनोखा प्रयोग राबवून समाजात नदी प्रेरणा निर्माण केली. शहादा तालुक्यात स्वत:च्या २५ एकर शेतीमध्ये व स्वत: M.Sc. Agri शिक्षण घेवून काळ्या आईची सेवा करण्याचे व्रत घेतले. नंदूरबार जिल्हा तसा जलसमृध्द, त्यातल्यात्यात शहाद्यात पैशाअभावी नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास दिवसेंदिवस होतांना दिसून आला. मोतीराम पाटील यांनी स्वत:च्या शेतात वाहणाऱ्या नाल्यांचे पुनरूज्जीवन केले. नाले व नदी नांगरून काढून अनोखा प्रयोग केला. नदी व नाल्यांचा पृष्ठभाग नांगरल्यामुळे मोकळा होवून वाहणारे पाणी थांबते केले व थांबलेले पाणी जमिनीत मुरू लागले. त्यामुळे जमिनीत पाण्याची उपलब्धता वाढली. बंद पडलेले बोअरवेल्स पुन्हा सुरू झाले. पाण्याच्या कमतरतेमुळे व तालुक्यात शेतीक्षेत्रात समृध्दीचे वातावरण निर्माण झाले. या अनोख्या प्रयत्नांचा पाठपुरावा शासनाला करण्यास उद्युक्त केले शासनानेही दखल घेतली. व ठिकठिकाणी हा प्रयोग विविध शेतकरी राबवत गेले. जवळजवळ ३५ कि.मी अंतरावरील सर्व बोअरवेलांना पाणी आले व अशा प्रकारचे ८० प्रकल्प हातात घेण्यात आल्याबरोबरच नवनियुक्त सरकारने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार अभियानाची अंलमलबजावणी शेतकरी करू लागले व खानदेशात जलव्यवस्थापनाच्या अनोखा प्रयोग समाजासमोर प्रत्यक्षात उभा राहिला.

धुळे तालुक्यातील पश्चिमेला वसलेले लामकानी गाव कुरण शेतीसाठी व पडीक रानमळा व्यवस्थापनासाठी प्रसिध्द आहे याचे श्रेय डॉ. धनंजय नेवाडकर यांना दिले जाते. सन २००० साली मोठ्या अपघातातून वाचून जीवनदान मिळाल्यानंतर पुढचे जीवन समाजकार्यात विशेषत: दुष्काळग्रस्त गावांच्या सहकार्यासाठी अर्पित करण्याचा मानस घेवून डॉ. नेवाडकर यांनी तेथील ३१० हेक्टर पडीक जमिनीचे दायीत्व स्वीकारले. डॉ. नेवाडकर यांनी महाराष्ट्रातील वसंतराव ठाकरे, पोपटराव पवार, डॉ. माधवराव चितळे यांचे मार्गदर्शन घेवून या ३१० हेक्टर जमिनीवर पंचसूत्री कार्यक्रम राबवला. म्हणजेच जल, जन, जंगल, वृक्ष व मृदा संधारण या घटकाकडे लक्ष केंद्रीत केले. त्यांनी या डोंगरउताराच्या प्रदेशात उताराला आडव्या दिशेने चर खोदले. याचा फायदा असा झाला की, पावसाळ्यात पडलेले पाणी वाहून न जाता तिथेच थांबले व जमिनीत मुरले त्यामुळे जमिनीत पाण्याची उपलब्धता वाढली. या ४०० हेक्टर कुरणावर चराईबंदी करून वाढलेला चारा जनावरांना खाद्य म्हणून उपलब्ध करून दिला. त्यामुळे मृदासंधारण मोठ्या प्रमाणात झाले. या संपूर्ण परिसरात कुऱ्हाडबंदी करून वृक्षतोड थांबवली. त्यामुळे या संपूर्ण परिसरात पाण्याची उपलब्धता तर वाढलीच त्याचबरोबर ओसाड पडलेला हा संपूर्ण भाग हिरव्या गवताने फुलला. शेजारीच बंद पडलेले



बोअरवेल पुन्हा सुरू झाले. आजूबाजूच्या परिसरातील विहीरींच्या पाण्याची पातळी वाढली व जलव्यवस्थापनाचा, जलसंधारणाचा अनोखा प्रयोग लामकानी गावात डॉ. धनंजय नेवाडकर यांनी समाजासमोर उभा



केला. या कामाची दखल घेत त्यांना सन २००२ साली संत तुकाराम पुरस्काराने गौरविण्यात आले. हे काम करत असतांना स्वत:च्या व्यवसायातून निर्माण केलेला पैसा या कुरणशेतीच्या विकासासाठी खर्च केला. व शासनाच्या रोजगार हमी योजनांच्या माध्यमातून कुरणशेती विकास केला. या कामाची दखल घेत अमीर खानने सुरू केलेल्या सत्यमेव जयते कार्यक्रमांतर्गत पाणी फाउंडेशनचे प्रशिक्षण केंद्र उत्तर महाराष्ट्रात बारीपाडा लामकानी गावात सुरू होत आहे. ही गोष्ट जलव्यवस्थापन क्षेत्रात आनंदाची आहे.

खानदेशातील प्राचीन जलव्यवस्थापनही प्राचीन काळापासूनच समृध्द असलेली परंपरा आहे. खानदेश म्हणजे तापी व नर्मदा नदीच्या मधला प्रदेश उत्तरेला सातपुडा पर्वत तर दक्षिणेला चांदोर, अजिंठा, सातमाळ्याच्या रांगा व पश्चिमेला सह्याद्री, तापीचे खोर तसेच पुर्णानदीचे खोरे म्हणजे खानदेश अशी समृध्द जलव्यवस्थापनाची परंपरा खानदेशला लाभल्यामुळे महाराष्ट्रात खानदेशचे नाव गौरवाने घेतले जाते. असा अभ्यास सरला भिरड यांनी स्वत:च्या अभ्यासातून केला. खानदेशात विविध नद्यांमुळे भूगर्भात पाण्याची उपलब्धता समृध्द आहे. परंतु मानवाने स्वत:च्या उपभोगामुळे व लालसेपोटी विपर्यास वापर केलेला दिसून येतो. हे चित्र बदलण्यासाठी समाजात जनजागृती करणे गरजेचे आहे. त्यासाठी ११ वे जलसाहित्य संमेलन प्रेरणादायी आहे. डॉ. विवेक चौधरी यांनी जळगाव जिल्ह्यात यावल तालुक्यात डांबुर्णी या गावात नदीचे पुनरूज्जीवन करून गावात जलव्यवस्थापनाचा अनोखा प्रयोग राबविला. गावात दोन नद्यांचा संगम हातनूर कॅनॉलचे पाणी असूनही आजूबाजूच्या विहीरी रिकाम्या झाल्या, बोअरवेल बंद पडले हे लक्षात आल्यानंतर शासनाच्या मदतीने व डांबुर्णी गावातील विविध कार्यकारी सोसायटीच्या मदतीने पुढाकार घेतला, हे वाहणारे पाणी कालव्यांमध्ये ४ इंच व्यासाचे ४ पाईप टाकले व त्यांना फुटव्हॉल्व लावले. कॅनालच्या वरच्या पातळीवरच त्याला ती बसवून प्रत्येकी एक ४ इंच पाईप जोडून ते सर्व ४ पाईप नदीमध्ये सोडले. दोन नद्यांमध्ये हे शक्य झाले. नंतर कालव्यातील पाण्याने ते पूर्ण पाईप भरून नदीत पाईप, पाण्याचा व्हॉल्व उघडल्यानंतर पूर्ण वेगाने चारही पाईप पूर्ण नदीमध्ये यायला लागले. नंतर ठराविक अंतरावर जेसीबी ने बांध टाकण्यात आले. हे काम एक महिन्यापर्यंत चालू ठेवले याचा फायदा असा की आजूबाजूला



२०-२२ कि.मी चा परिसर जलमय झाला.

खानदेशची जलसंसकृती वर अध्यक्षीय भाष्य करतांना डॉ. सर्जेराव भामरे यांनी खानदेशातील अभिनव जलसिंचन पध्दतीचा उहापोह केला. खानदेशात पांझरा नदीचा उगम शेंदवडच्या डोंगरातून होतो. पांझरा नदी पूर्वेकडे ९९ कि.मी वाहत जाते. पिंपळनेरच्या पुढे जामखेडी, व साक्रीजवळ कान नदी तिला येवून मिळते व ती पुढे मुळावद गावाजवळ तापीला जावून मिळते. असा तिचा प्रवाह धुळे जिल्ह्यात आहे. साक्री तालुक्यात नदीचे १३८ कि.मी लांबीचे खोरे ३२५७ चौ.कि.मी असून ते पाणी शेतीसाठी वापरण्याकरिता २ ते ५ मीटर उंचीपर्यंत दगडी बंधारे बांधून त्यावर फडपध्दतीने शेतीस पाणीपुरवठा आजपर्यंत केला जात होताय या फड पध्दतीचा इतिहास रोमहर्षक आहे. या पध्दतीमुळे पाण्याचा जास्तीत जास्त वापर शेतीसाठी होत असे त्यामुळे शेती, दुग्धव्यवसाय, वृक्षसंवर्धन इ. घटकांच्या विकासाला वाव होता. ही बंद पडलेली अभिनव फडपध्दतीला जागतिक वारसा मिळविण्यासाठी सर्व खानदेश वासीयांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन यंत्रणा, लोकसहभाग, विविध सामाजिक संस्था, यांनी एकत्र येवून बंद पडलेली फड सिंचन पध्दत पुन्हा पुनरूज्जीवित करून तिला नवसंजीवनी देणे गरजेचे आहे. असे मत डॉ. सर्जेराव भामरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.



*****

# कवी संमेलन

डॉ. अस्मिता गुरव

**सत्राचे अध्यक्ष : श्री. प्रकाश होळकर**
**मान्यवर कवी : श्री. अशोक कोतवाल, श्री. कमलाकर देसले, श्री. तुकाराम धांडे, श्री. प्रकाश किनगावकर श्रीमती. अस्मिता गुरव, श्री. अशोक निळकंठ सोनवणे, श्री. रावसाहेब कुवर, श्रीमती योगिता पाटील, श्री. प्रभाकर शेळके, श्री. रमेश पवार, श्री. लक्ष्मण बारहाते**

देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन तसेच भारतीय जलंसस्कृती मंडळ शाखा धुळे आयोजित ११ वे जल साहित्य संमेलन दिनांक २० व २१ जानेवारी रोजी वेदांत मंगल कार्यालय, नकाणे रोड, देवपूर - धुळे येथे संपन्न झाले. गेले दहा वर्ष झाले जलसाहित्य संमेलनाचे आयोजन वेगवगेया शहरातून करण्यात आले होते... यंदा धुळ्यात हा उपक्रम घेण्यात आला... या पुढेही हा उपक्रम महाराष्ट्रात दर वर्षी घेण्यात येईलच. पाणी या अत्यंत आवश्यक अशा घटकाची सातत्याने होत असलेली घट ही समाज आणि सजीवाच्या दृष्टीने गंभीर होत असलेली समस्या आहे आणि त्याला जबाबदार असलेली अनेकविध कारणे शोधून त्यावर शक्य असलेल्या उपाययोजनांवर विचार करण्याच्या दृष्टीने जल साहित्य संमेलनाचे आयोजन महत्वाचा उपक्रम आहे.



ज्या जिल्ह्यात हे संमेलन होते त्या प्रादेशिक भागातील जलसंस्कृती, परिस्थिती, जलसिंचन, प्रकल्पाची आवश्यकता आणि उपलब्धता, लोकसहभाग, विहीरींद्वारे सिंचन प्रकल्पाची रूजूवात, त्यातील वाढ, जलशिवार युक्त योजनेत लोकांचा सहभाग वाढविणे, जलसाक्षरता, कुरणशेती प्रयोग, पाण्याचा उत्पादक वापर, सिंचन क्षमतेत वाढ यासारख्या अनेक बाबींचा विचार, चर्चा, माहिती आणि शासकीय यंत्रणेची मदत कशा प्रकारे मिळवता येते. या सारख्या प्रश्नांचा सविस्तर वेध घेण्याचा प्रयत्न या संमेलनातून होत असतो. त्यातून नियोजनबध्द आराखडे तयार करून वर्षभर कार्य करण्याचे नियोजन तयार करण्यात येते आणि त्यानुसार कार्य केले जाते. त्यातून नक्कीच अपेक्षित फलित काही प्रमाणात तरी मिळते म्हणूनही दरवर्षी या संमेलनाचे आयोजन होत असल्याचे दिसते.

जलसाहित्य संमेलनात कविसंमेलनाचे आयोजन हा देखील एक स्तुत्य उपक्रम आहे असे म्हणता येईल. यातील कविसंमेलन पाऊस पाणी- पाण्याअभावी शेतीकऱ्यांची होत असलेली दुरावस्था, शेतीचे



प्रश्न, सिंचन प्रकल्पातील झारीतील शुक्राचार्य आणि शेतजमिनीचे तुकडे, पशुपालनाचे प्रश्न, दुष्काळ पिकाची आणेवारी, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, ग्रामीण भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, धरण प्रकल्पातले भ्रष्टाचार या सारख्या प्रश्नांवर प्रकाश



टाकणाऱ्या कविता या कविसंमेलनातून सादर करण्यात आल्या आणि साहित्यिक निसर्ग आणि सामाजिक समस्येकडे किती गंभीरपणे बघतो, विचार करतो, त्याचे चिंतन – मनन आणि मांडणी ही केवळ रंजनात्मक नसून तो या सगळ्या परिस्थितीची दखल आपल्या लेखनातून घेतो आणि आपल्या कथा – कादंबऱ्या आणि कवितेतून वाचकांना अंतर्मुख होवून विचार करायला भाग पाडतो हे या संमेलनात सादर करण्यात



आलेल्या कथा – कवितांमधून जाणवले.

निसर्गकवी, गीतकार प्रकाश होळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कविसंमेलनात एकूण १२ कवींनी आपल्या प्रत्येकी दोन कविता सादर केल्या. प्रत्येक कवीने पाणी त्याची आवश्यकता, त्याचे दुर्भिक्ष्य आणि त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती तसेच या परिस्थितीला कारणीभूत असलेला माणूस आणि उद्भवलेल्या समस्येला बळी पडणारा



त्यात भरडला जाणारा माणूस यावर भाष्य करणाऱ्या कविता सादर करून आपल्या संवेदनशीलतेचे दर्शन घडविले. कवीला काय हवं असतं... कवीला त्याच्या मनातली सुख – दु:ख व्यक्त करायला शब्द हवे असतात आणि दु:खाचा वेध घेणारी कविता समजून घेणारा श्रोता हवा असतो... जलसाहित्य संमेलनात सहभागी असलेल्या प्रत्येकाकडे पाणी प्रश्नाकडे सजगतेने बघणारी प्रत्येक बाब समजून घेण्याची प्रवृत्ती असल्याने कवी आणि श्रोता यांचेत ये ह्रहयीचे ते ह्रदयी पोचणारे शब्द आणि भावनेचा अविष्कार असलेली कविता हा सशक्त दुवा असल्याने ही मैफल



खोलवरची ओल टिपणारी सखोल विचार मंथनाची बैठक होती मैफलीची सुरूवात कमलाकर देसले या ज्येष्ठ गझलकार कवी यांनी आपल्या दमदार गझलने केली.

अगा करूणा करा<br>
निर्लज्जांनी आपटली<br>
सरस्वतिची वीणा

यानंतर येवला येथून आलेले कवी लक्ष्मण बारहाते यांनी आपल्या दोन कविता सादर केल्या.



पोटपाखीचा पाझर
करी ढेकळाचे लोणी
द्यावे आयुष्य झोकून
अशी माय बहुगुणी...
पहाटेला बाप
रानामध्ये जाई
दांडामध्ये पाही
चंद्रभागा...

राहवसाहेब कुवर यांनी **शिवारात नाही पडल्या धारा** आणि **आत्महत्येचं कारण** या दोन कविता ऐकवल्या आपल्या कवितेतून ते सांगतात...



शिवारात नाही पडल्या धारा
गावात सुटला भणाण वारा
मेघाविन झाले मुके आभाळ
पाताळात गेला पाण्याचा तळ
नक्षत्र कोरडे, मनी ओरखडे
मातीला तडे नी कुणबी रडे...

शेतकरी आत्महत्येने अवघ्या राज्यात शोककळा पसरली, शासकीय मदत, आणि यंत्रणेतल्या आडकाठी, पॅकेज, संकल्पना यावर भरभरून बोलले, लिहिले गेले,... मदतीचे हात पुढे करणाऱ्या संस्था, संघटना पुढे आल्या तरी आपण सारी जर त्या देवाची लेकरं आहोत तर निसर्गाची अवकृपा आणि त्यामुळे होणाऱ्या आत्महत्या याकडे कवी वेगळ्या नजरेनं बघतो तो म्हणतो...

तुझे दयाळू दयाघन रूप
पुन्हा कर धारण
बाप कधीच होत नसतो
मुलाच्या आत्महत्येचं कारण...

नव्या पिढीचं प्रतिनिधीत्व करणारी कवियत्री योगिता पाटील यांनी **रिंगण** आणि **दुष्काळ** या दोन कविता ऐकवल्या त्यापैकी मुक्तछंदातल्या रिंगण कवितेतून त्यांनी पाण्याच्या शोधात भटकत राहिलेल्या एका गावाने मुक्काम केला तेव्हाची गोष्ट... त्यांनी सांगितली तर दुष्काळ नावाच्या गझलमध्ये त्या म्हणतात..

आज झाली घोषणा राज्यात या दुष्काळ आहे
जाहिराती वृत्तपत्री गाजला दुष्काळ आहे
मागल्या सालात चकवा बेतलेला पावसाचा
ओल थांबेना झडीची सावळा दुष्काळ आहे...



खानदेशात बाराही महिने २/३ दिवसाआड नळाला पाणी येतं आणि पाण्याचा दिवस हा अगदी महत्वाचा दिवस असतो. पिण्याचे, वापरण्याचे, पै-पाहुणा आला - गेला तर हे जमेस धरून पाण्याची साठवण करावी लागते... म्हणूनही खानदेशात पाणी येणार म्हणजे सगळी कामं सोडून घरदार पाण्याच्या प्रतीक्षेत असतं हे वर्षानुवर्षा पासूनच चित्रं ज्येष्ठ कवी अशोक कोतवाल यांनी आपल्या कवितेतून रेखाटलं आहे. त्यांनी पाणी खेळवतय झुंझवतय आणि पाण्याचे दिवस या कवितेतून वास्तवाचं चित्र उभं केलय ते म्हणतात...

रात्री बायका झोपेत बडबडतात
नळाला पाणी आलय
मुलं भांबावून उठवून विचारतात
आई नळ आले का ?
माणसं बाहेरून घरी फोन करतात
पाणी येवून गेलं का ?
सर्वांना जीवतोड करायला लागवणारं
हे पाणी, गावं - शहरांपासून
अगदी दूर दूर जातय



त्याचे रोज येण्याचे दिवस
लांबतच चाललेत....

तर तुकाराम धांडे सारखा आदिवासी भागातून आलेला संवेदनशील कवी आपल्या कवितेतून डोंगर कपारीतून झरणाऱ्या पाण्याचे दिवस हरवून गेलेत आता शुष्क खडक आणि रखरखीत डोंगरांच दुःख हे तळाशी वस्तीला असलेल्या माणसाच्या जगण्याचं भाग होवून गेल्याची व्यथा मांडताना कवी लोकांच्या मनावर असलेल्या देवादिकांच्या श्रध्देचे परिमाण देतो आणि साहेबांनी जर सरकारी यंत्रणेचा नेकीनं वापर करून लोकांना पाणी ...

आता कलीयुगामंदी
तुम्ही त्या तिकडच्या धरणातून
लिफ्टनं पाणी उचलून
या डोंगराच्या माथ्यापर्यंत
आणून सोडलं आणि
एखाद्या कपारीतून भकाभका बाहेर काढलं
तर तुम्ही रामापेक्षाही मोठे होवून जाल
साहेब....

कविसंमेलनाचे सूत्रसंचालन करणारी कवीयत्री अस्तिमा गुरव यांनी **तिसरे महायुध्द** आणि **पाणी रडतय आतल्या आत** या दोन कवितेतून पाण्याअभावी भोगाव्या लागणाऱ्या यातनांची भीती व्यक्त करतानाच माणसाचा स्वार्थीपणा पाहून पाणीही रडतय आतल्याआत या कवितेत कवियत्री म्हणते,



पाणी गाळात रूतलय
गाळ मनात साचलाय
मन स्वार्थात गुंतलय
स्वार्थ माणसात भिनलाय
गाळ कागदोपत्री निघतो
प्रवाह वास्तवात गुदमरतो
योजना अन् यंत्रणेच्या
भोवऱ्यात पाणी गरगरत
सौदेबाजीच्या पटावर गाळ सोंगटी म्हणून वापरतो
हे पाहून पाणी रडतं आतल्याआत...

कवी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ निसर्गकवी प्रकाश होळकर यांनी अध्यक्षीय मनोगतातून पाण्यासंदर्भातली एक बोधकथा सांगून दोन कविता ऐकवल्या, आपल्या भाषणातून त्यांनी सध्याची नैसर्गिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती आणि सरकारी यंत्रणेची प्रक्रिया या विषयी अतिशय नेमकेपणाने मुद्देसूद विवेचन केले आणि जलसाहित्य संमेलनासारख्या उपक्रमाची उपयुक्तता आणि त्यातून कार्यन्वित होणाऱ्या योजनांविषयी सांगून आज पाण्याच्या समस्येकडे प्रत्येकाने गांभीर्याने बघण्याची आजच्या काळाची गरज असल्याचे सांगून या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले आपल्या कवितेतून कवी



म्हणतो....

पाणी मागावे नभाला
नभ कोरडे कोरडे
डोई पोटावर भार
आले घागरीला तडे...
पाणी शोधता शोधाता
जीव घाबरा होताना
गायीगुरांचा हंबर
सांज भरून येताना...

मैफलीची सांगता कमलाकर देसले यांच्या **आरसा** या गझल गायनाने करण्यात आली. या कविसंमेलनात प्रकाश किनगावकर, अशोक नीलकंठ सोनवणे, प्रभाकर शेळके आणि रमेश पवार यांनी देखील अतिशय उत्तम कविता सादर करून जलसाहित्य संमेलनातले हे कविसंमेलन संस्मरणीय केले.

# खुली मुलाखत - साहित्य विश्वात पाण्याच्या संगोपन, संवर्धनावर मंथन आवश्यक : डॉ. माधवराव चितळे

**पत्रकार श्री.अमोल पाटील, दिव्यमराठी, धुळे**
**मोबाईल : ९०४९९९३५६३**

**खुली मुलाखत : डॉ. माधवराव चितळे**
**डॉ. दि.मा. मोरे**
**श्री. सतीश खाडे, श्री. अभिजित करंडे, श्री. संजय झेंडे**

कांदबरीच्या माध्यमातून समाजाचे भावनिक विश्व बदलविता येते. साहित्यात एवढे सामर्थ्य आहे. साहित्याच्या माध्यमातुन समाजाच व पाण्याचे नाते सादर होऊ शकते, हेच अनुभव विश्व विस्तारण्याची गरज आहे. साहित्य विश्वात पाण्याच्या संगोपन,संवर्धनावर विस्ताराने मंथन झाले तर भविष्याची दिशा बदलू शकते असे प्रतिपादन जलतज्ज्ञ डॉ.माधवराव चितळे यांनी केले.



जलसाहित्य संमेलनाच्या निमीत्ताने रविवार दिनांक २१ जानेवारी २०१८ रोजी सकाळी सतीष खाडे यांनी डॉ.चितळे यांची खुली मुलाखत घेत चर्चा केली. या मुलाखतीत सिंचन सहयोगचे दि.मा.मोरे, पत्रकार संजय झेंडे, एबीपी माझाचे निवेदक अभिजीत करंडे यांनी सहभाग नोंदविला. सतीष खाडेसह उपस्थितीच्या प्रश्नांना डॉ.चितळे यांनी ओघवत्या शैलीत उत्तरे देत पाणी वापर, संगोपन, संवर्धन आणि भविष्यातील पाण्याची गरज व नियोजन या सर्वच मुद्यांवर विवेचन केले. या शिवाय जलसाहित्य समृध्दीच्या मुद्यांवर देखील डॉ.चितळे यांनी प्रकाश टाकला. या वेळी माधवराव चितळे यांनी सांगीतले की, पाण्यासाठी एकच नियम आता चालणार नाही. तर राज्य आणि जिल्ह्याच्या विशिष्ट भौगोलीक स्थितीचा विचार करुन नियोजन होणे आवश्यक आहे. शेती,नागरी उद्योग,सिंचन अशा सर्वच क्षेत्रांवर पाण्याचे परिणामकारक नियोजन करता येऊ शकते. दुष्काळ आणि अवर्षणाच्या स्थितीचा विचार करुन पाण्याचा पुनर्वापरावर देखील मंथन होणे आवश्यक आहे. आता पर्यंत अवर्षण आणि दुष्काळ हे परस्पर पुरक शब्द म्हणून वापरण्यात आलेली आहेत. मात्र प्रत्यक्षात अवर्षण हे दिर्घकालाचे आव्हान यावर सुयोग्य नियोजनाची आवश्यकता आहे. तर दुष्काळ ही मानवनिर्मिती आपत्ती आहे. दुष्काळाचा बिमोड करण्यासाठी मानवानेच उपाय योजना करणे आवश्यक आहे. दुष्काळावर मात करणे सहज साध्य आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पीक रचनेत बदल, गवताळ भाग वाढ,लोप पावत चाललेल्या पशुधनाचा विकास आणि विस्तार वाढला तर अवर्षण आणि दुष्काळाचा बिमोड होऊ शकणार आहे. पाण्याच्या नियोजनावर चर्चा करतांना

इस्त्राईल,स्पेन, आस्ट्रेलिया या देशासह अवर्षण प्रवण कॅलीफोर्निया या राष्ट्राच्या औद्योगीक उत्पादन व नियोजन व्यवस्थेचा विचार करणे आवश्यक आहे. या देशानी पाणी नियोजनामुळेच अवर्षणावर मात करीत सर्वांगिण विकास साधला आहे. मात्र भारतात ते मोठ्या अवधी नंतर देखील शक्य होऊ शकले नाही. याचे असंख्ये कारणे आहेत.त्यात महत्वाचे कारण म्हणजे भारताची अनुवाद व्यवस्था सदृढ झालेली नाही.

**अनुवाद व्यवस्था सदृढ झाली पाहिजे :** ज्या वेळेस देशातील बहुतांश वर्ग हा स्वभाषेतुन अभिव्यक्त होईल. त्या वेळेस देशाची वैचारीक उंची वाढीस लागण्यास मदत होईल. भारत हा बहुविध भाषा व भौगोलीक विभिन्नतेचा देश आहे. मोठ्या अवधी नंतर देखील भारतीय भाषांची अनुवाद व्यवस्था बळकट होऊ शकलेली नाही. परिणाम स्वरुप पाण्याच्या दिर्घकालीन उपाय योजनांवर त्याचा परिणाम जाणवतो. हीच बाब आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील प्रकर्षाने जाणवते. भारतात इंग्रजी भाषेला अवास्तव महत्व दिले गेले आहे.मात्र इंग्रजीची करंगळी धरुन देश मोठा होणार नाही. तर स्वभाषेतून अभिव्यक्त झाल्यास देशाची सर्वांगिण विकासाकडे वाटचाल होऊ शकते. आज भारतात दहा टक्के समाजाला इंग्रजी समजते आकलन होते. मात्र हा समाज इतर ९० टक्के समाजा पासुन स्वत:ला अलिप्त ठेवतो. परंतु उर्वरीत समुदायाला शिक्षीत करण्या बरोबरच स्वभाषेचा अंगीकार करण्याची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. मुलाखतीच्या दरम्यान प्रदिप भिडे यांनी ऑनलाईन प्रश्न उपस्थित केला. त्यात पाणी साक्षरतेसाठी जलयुक्त शिवार अभियाना सारख्या अभियानांची माहिती पाठ्यक्रमात समाविष्ठ व्हावेत का असा प्रश्न उपस्थित केला.त्या संदर्भात बोलतांना डॉ.चितळे म्हणाले की, भारतातील वैचारीक विश्व त्यात देखील विज्ञान, अर्थशास्त्र, भूगोल या सारख्या महत्वाच्या शास्त्र हे आंग्लभाषा प्रभावीत आहेत. एका विभिन्न वयोगटा नंतर वैचारीक पातळीत वाढ होत असतांना स्वभाषेतून उपयुक्त उपक्रमांची मांडणी होणे आवश्यक आहे. या करीताच भारतात प्रबळ अनुवाद व्यवस्था प्रबळ झाली पाहिजे. जो पर्यंत विकसीत राष्ट्रांचे विविधांगी प्रयोग स्वभाषेत उपलब्धा होणार नाहीत. जलधोरणांची दिशा ठरविता येणार नाही. या सर्वांचा विचार करता अनुवाद व्यवस्थेसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. भारताचे अनुवाद व्यवस्था खूपच कच्ची आहे. इंग्रजीपलीकडे दुसऱ्या राष्ट्राच्या भाषांकडे आपले लक्षच नाही. जगातील इतर भाषाही शिकल्या पाहिजेत. जगाचे प्रतिबिंब आपल्या स्वभाषेतही उमटले पाहिजे. या माध्यमातून समाजाची वैचारीक उंची वाढण्यास मदत होईल.

**लोकप्रवण व्यवस्था निर्माण होणे आवश्यक :**

शासकीय धोरणांचा पाणी प्रश्नावर काय परिणाम होतो या अनुषंगाने बोलतांना डॉ.चितळे यांनी सांगितले की, पाणी हा मासणाच्या आयुष्यातील मुख्य घटक आहे. या क्षेत्रात परिवर्तन करावयाचे असल्यास शासन प्रवण व्यवस्था ठेवायची नाही. तर लोकप्रवण व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. सरकार काय करेल या पेक्षा प्रत्येक व्यक्तीने संगठीत होऊन प्रयत्न केले पाहिजेत. या करीता समाजाला जागृक करणे आवश्यक आहे. ही जागृती संमेलनाच्या माध्यमातून होऊ शकते. जागृती हा पहिला टप्पा असेल जागृत समाजाला संगठीत करणे हा दुसरा टप्पा तर तिसऱ्या टप्प्यात जागृत संगठीत समाजाने निर्मल भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत होण्याची गरज आहे.आज शहरा शहरांमधील नद्यांच्या बकाल झालेल्या स्थितीवर शासन काही करेल काय असा प्रश्न उपस्थित करण्या ऐवजी निर्मल शहर,निर्मल राष्ट्रासाठी मी पुढाकार का घेऊ नये असा प्रश्न लोकप्रवण व्यवस्थेत स्वत:च स्वत:ला विचारला जाईल. जो पर्यंत लोकप्रवण व्यवस्था निर्माण होत नाही.तो पर्यंत व्यक्ती शासन केंद्रीत राहिल. मात्र जेव्हा लोकप्रवण व्यवस्थेचे निर्मिती होईल. त्या वेळेस पांझरा, मुळा, मुठा, गोदावरी सारख्या नद्यांची अवस्था बदलेल.

**धुळ्यात कुरण क्षेत्राचा विकास आवश्यक :**

जगाच्या पाठीवर धुळे असे एकमेव शहर आहे ज्याचे नाव धुळीने ठेवण्यात आले आहे. इंग्रजीत अशा नावाचे शहर सापडणार नाही.मात्र हे नाव भौगोलीक परिस्थिती नुसार हे नाव पडले,मात्र आता हा चेहरा बदलण्याची गरज आहे.या करीता कुरण व्यवस्था वाढीस लागणे आवश्यक आहे. धुळे जिल्ह्यात ३५ टक्के जमीन आच्छादन सरंक्षण विहीन आहे. याच ३५ टक्के जमीनीवर कुरण व्यवस्था विकसीत होणे आवश्यक आहे.जर या ३५ टक्के क्षेत्रावर कुरण व्यवस्था विकसीत झाली तर धुळ्याचे नाव व चेहरा बदलण्यास मदत होईल. कुरण व्यवस्था विकसीत झाली. तर जमीनीत पाण्याचे संचय व सिंचन मोठ्या प्रमाणात होऊन भूजल पातळीत देखील वाढ होणार आहे. या दृष्टीने सर्व वन व जल मित्रांनी संगठीत होऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**दुष्काळमुक्तीसाठी ही दिल्या टिप्स :**

मानवी कौशल्य कमी पडल्याने दुष्काळ निर्माण होतो.१३ व्या ते १६ व्या शतकाच्या कालखंडातही भारतात अनेकदा दुष्काळ पडला. मात्र १६३० ते १८३० पर्यंतच्या कालावधीत दुष्काळ नव्हता. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास दुष्काळावर मात करणे शक्य आहे.यासाठी सामाजीक कौशल्य विकसीत करणे गरजेचे आहे. पूर्वी धान्याचे भांडार चाऱ्याची व्यवस्था मजबुल होती. त्यामुळे आलेल्या संकटावर मात केली मात्र कालांतराने ही व्यवस्था बदलल्यामुळे आता दुष्काळाची भिषणता तिव्रतेने जाणवते. मात्र सुयोग्य नियोजन केल्यास दुष्काळावर मात करता येते. पूर्वी जी व्यवस्था दिर्घकालासाठी तयार करण्यात आली होती.तीच व्यवस्था आता मर्यादीत कालावधीसाठी करण्यात येते. २००६-०७ मध्ये राज्यात पडलेल्या दुष्काळाच्या वेळी छावण्या, चाऱ्याची व्यवस्था उत्तम प्रकारे केल्याने दुष्काळावर मात करता आली. पाणी,चारा, अन्नधान्य कुशलतेने हाताळल्यास दुष्काळाचे संकट निवारता येते हे त्याचे मोठे उदाहरण होते.अल्प पावसाळा असतांना देखील जगातील काही देशांनी योग्य नियोजनातुन दुष्काळावर कायम स्वरुपी मात केलेली आहे. आपण फक्त अमेरीका इंग्लड या सारख्या देशांचाच विचार करतो. पाण्याच्या पुनर्वापराचे मोठे मॉडेल इस्त्राईल, स्पेन, आस्ट्रेलिया या देशानी उभी केली. तर क्युबा या लहानश्या देशाने घराच्या छतावर भाजीपाल्याची निर्मिती होऊ शकते याचा मोठा वस्तुपाठ निर्माण करुन दिला आहे.हा देश भाजीपाला उत्पादनात स्वयंपूर्ण झाला आहे. जगातील अशा यशस्वी राष्ट्राचा अभ्यास झाला पाहिजे. या प्रयोगातून दुष्काळावर मात करण्या बरोबरच देशातील तरुणांना पाण्याच्या माध्यमातून करीयरच्या संधी देखील चालून येऊ शकतात.

# युवा पिढी आणि पाणी

**प्रा. योगेश भामरे, मेहेगाव, ता.जि. धुळे -**
**मो : ९४२१४३९७०१**

**सत्राचे अध्यक्ष : श्री. मुकुंद कुलकर्णी**
**श्री. सतीश खाडे**
**डॉ. सर्जेराव भामरे**

मुकुंदराव कुलकर्णी यांनी युवा पिढी व पाणी या विषयावर मार्गदर्शन केले. स्वत: आदिवासी संस्कृतीवर PhD करून ४० वर्षे आदिवासी भागात फिरले. ज्या भागात दारिद्र्य आहे, दुष्काळग्रस्त स्थिती आहे अशा भागची पाहणी केली, पाण्याने मरणारे समाज पाहिलेत, अवर्षणाने होरपळून निघणारा समाज पाहिला व अशा सामाजिक समस्यांवर काम करण्याचे व्रत घेवून आदिवासी भागात पाण्यावर काम करत आहेत. संपूर्ण देशात ज्या संस्था, जे समाजसेवक, जे कार्य करत आहेत ते उद्याचे दीपस्तंभ आहेत. अशी भूमिका त्यांनी व्क्त केली. निसर्गात वाहणाऱ्या नद्या एकेकाळी हसत होत्या, बोलत होत्या. त्यामुळे त्यांचे जीवन समृध्द होते परंतु भोग आणि उपभोग व स्वत:ला आधुनिक विकासाच्या हव्यासापोटी या नद्यांची समृध्दी मानवाने हिरकावून घेतली व आज याच नद्या कोरड्या व उदास अवस्थेत पडल्याचे चित्र आपण पाहत आहोत. आणि आतातर



याच प्रश्नावर पुन्हा समाजाच अनेक प्रकारचे युध्दजन्य परिस्थिती आपल्याला पहावयास मिळते. हंड्याभर पाण्यासाठी पायपीट, पाण्याच्या अभावी उध्वस्त झालेल्या जनावरांच्या छावण्या, धोक्यात आलेले औद्योगिक क्षेत्राचे अस्तित्व, ओसाड पडलेली हजारो हेक्टर जमीन पाणी या नावानेच विवंचना करीत आहेत. त्यासाठी समाजातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. काही समाजप्रेमी लोक, संस्था, दीपस्तंभासारखे समाजात उभे राहून पाणी व्यवस्थापन, जलसाक्षरता, पर्यावरण संवर्धन व अनेक प्रकारची कामे करत आहेत. खऱ्या अर्थाने हे दायित्व युवा पिढीने स्वीकारली पाहिजे. शालेय जीवनापासूनच पाण्याचे धडे गिरवण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्युक्त केले पाहिजे.

१२५ कोटींचा युवकांचा देश संपूर्ण जगामध्ये विविध कौशल्य प्रदर्शित करीत आहे. दुर्दैवाने पाण्यासारख्या महत्वपूर्ण घटकावर युवकांचे लक्ष केंद्रीत नाही. ही गोष्ट देशाच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक घटकांसाठी हानिकारक आहे. विद्यापीठ स्तरावर यासाठी विविध उपक्रम राबविले गेले पाहिजे. सेवा




योजनांच्या माध्यमातून पाण्याचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी विविध शिबीरे, कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित केले पाहिजे. हे ज्वलंत आवाहन ज्या दिवशी युवक पेलतील त्या दिवशी पाण्याचा उत्सव साजरा होतांना याच देही याच डोळा दिसण्यावाचून राहणार नाही. ही वृत्ती युवकांच्या ठायी बालमनापासून रूजली पाहिजे हे कार्य कुण्या एका व्यक्तीचे नसून देशाप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. असे मार्मिक भाष्य डॉ. मुकुंदराव कुलकर्णी यांनी ११ व्या जलसाहित्य संमेलनात सहभागी असलेल्या युवकांना उद्देशून केले. या कार्यात अजून काय प्रयत्न करता येतील यासाठी डॉ. कुलकर्णी यांनी युवकांची मते जाणून घेतली व युवकांना जलसाक्षरतेचे, जलव्यवस्थापनाचे आवाहन केले.

*****





**जलदिंडी पूजन**







**संमेलनात घेतलेल्या स्पर्धेतील बक्षिस विजेते**







# माध्यमे आणि जलसाक्षरता

**श्री. जितेंद्र तलवारे**

**सत्राचे अध्यक्ष : श्री. सूर्यकांत रहाळकर**
**वक्ते : श्री. संजय चांदेकर, श्री. रविंद्र शुक्ल,**
**श्री. अभिजित करंडे, श्री. संदीप पाटील**

अकरावे जल साहित्य संमेलन धुळे येथे दिनांक २० आणि २१ जानेवारी २०१८ रोजी देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन, धुळे आणि भारतीय जलसंसकृती मंडळ, शाखा धुळे यांच्यातर्फे आयोजित करण्यात आले. या संमेलनात जल साहित्यासंबंधी अनेक सत्र ठेवण्यात आलेली होती. त्यात माध्यमे आणि जलसाक्षरता हे स्वतंत्र सत्र होते. या सत्राचे अध्यक्ष श्री. सूर्यकांत राहाळकर, अध्यक्ष नाशिक एज्युकेशन सोसायटी हे होते या सत्रात खालील मान्यवरांनी मार्गदर्शन केले –

**संजय चांदेकर :**

सुरूवातीला श्री. संजय चांदेकर यांनी सर्वात प्रभावी प्रसाराची माध्यमे कोणती ? हा प्रश्न उपस्थितांना केला त्यात रेडिओ, वृत्तपत्र, मोबाईल. टि.व्ही अशी उत्तरे आली परंतु त्यांच्या मते सर्वात जर कोणते प्रसाराचे उत्तम माध्यम असेल तर ते स्वत: मनुष्य आहे. माणूस स्वत: एक प्रभावी माध्यम म्हणून




समाजात आपला प्रभाव टाकत असतो. रेडिओ हे प्रसारमाध्यमांमधील सर्वात जुने माध्यम आहे. या माध्यमातून जलसाक्षरता प्रभावीपणे करणे शक्य आहे. समाजाच्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचणे शक्य आहे. १८९६ मध्ये प्रथम चित्रपट फ्रान्समध्ये प्रकाशित झाला, त्यानंतर १९१० मध्ये पहिले रेडिओ स्टेशन अमेरिकेत स्थापन झाले व भारतात १९२७ मध्ये रेडिओ स्टेशन आले. इंडियन ब्रॉडकास्टिंग या खाजगी कंपनीने रोजचे खाजगी कार्यक्रम प्रसारित करण्याचे ठरवले. ही यंत्रणा जीवंत राहण्यासाठी इंडियन ब्रॉडकास्टिंग सर्विसेसने ही जबाबदारी स्वीकारली. पुढील काळात सॅटेलाईट टेलिव्हिजन अस्तित्वात आले. त्यामुळे पारंपारिक माध्यमांना याचा फटका बसला. इंटरनेट, टिव्ही व सोशल मिडिया या सारख्या नव्या माध्यमामुळे वर्तमानपत्राचे अस्तित्व धोक्यात येणार असे वाटत होते. असे असतांना वर्तमानपत्रानेही इंटरनेटची कास धरली आहे. एफ. एम



स्टेशन आली तेव्हा रेडिओला पुन्हा एक नवीन संजीवनी मिळाली. नवीन माध्यमे अस्तित्वात येतात जुन्या माध्यमांवर त्याचा परिणाम होतो. कितीही चढउचार आले तरी वृत्तपत्रे  आणि रेडिओ यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

भारत सरकारने एक क्रांतीकारी पाऊल उचलून सामुदायिक रेडिओ ही संकल्पना उदयास आणली त्यात २१० रेडिओ स्टेशन सुरू आहेत. देशबंधू आणि मंजू गुप्ता फाउंडेशन पांझरा कान रेडिओ स्टेशन सुरू आहे. सामुदायिक रेडिओ स्टेशनमध्ये स्वत: रेडिओ केंद्रावर जावून आपले मत मांडता येते. यामुदायिक  रेडिओच्या माध्यमातून अशा लोकांना सामावून घेवून त्यांच्या मतांचे प्रसारण केले जाते. प्रत्यक्ष कृतीतून त्यांचे सादरीकरण केले जाते.



**रविंद्र शुक्ल :**

जलसाक्षरतेसाठी वृत्तपत्राची भूमिका अतिशय महत्वाची आहे असे मत श्री. रविंद्र शुक्ल यांनी व्यक्त केले.  जोपर्यंत लोकांच्या हातात पेन आणि कागद आहे तोपर्यंत वृत्तपत्राचे महत्व कायम आहे. वृत्तपत्रात जलसाक्षरतेसंबंधी अनेकदा लेखन असते. जलसाहित्य संमेलनाचे चांगले संकलन प्रसिध्द झाले आहे ते समाधानकारक आहे. पाण्यासाठी वृत्तपत्राची प्राथमिकता असायला हवी त्यासाठी पत्रकारांची भूमिका महत्वाची आहे कारण पत्रकार या माध्यमातून समाज परिवर्तनाची भूमिका निभाऊ शकतात. बऱ्याच वेळा खऱ्या बातम्या पुढे येत नाही. विषय लेखनाच्या संदर्भात दृष्टी असायला हवी, पाण्याचा प्रश्न गंभीर असून तो योग्य पध्दतीने मांडण्याची गरज आहे. त्यासाठी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. पाण्याच्या समीक्षेवर विवाद निर्माण होतात व त्यामुळे समाजात असंतोष निर्माण होतो त्यासाठी वृत्तपत्राची भूमिका महत्वाची आहे.

समाजाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास योजनांची माहिती पोहचवण्यासाठी पत्रकारांच्या माध्यमातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. वृत्तपत्राची भूमिका समाजाप्रती निष्ठावान असावी. जलसाक्षरता करण्यासाठी पत्रकारांपासून सुरूवात होणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विविध परिसंवाद,कार्यशाळेचे आयोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध कोर्सेस निर्माणकरून ते सर्वांपर्यंत



पोहचवले पाहिजे. जलपत्रकारिता, पर्यावरण, पत्रकारिता स्वतंत्रपणे निर्माण झाले पाहिजे व त्यासाठी समाजाचेही प्रोत्साहन असायला हवे. पत्रकारांनी जलसाक्षरता विषयावर संशोधन करून हा विषय राजकारणापासून दूर ठेवून त्याची मांडणी करायला हवी. स्वयंसेवी संस्था समाज यांच्यामध्ये समन्वय निर्माण होणे गरेजेचे आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने पाणीप्रश्नावर सविस्तर चार्च होणे गरेजेचे आहे असे मत शुक्ल यांनी व्यक्त केले.

**अभिजीत करंडे :**

दृकसाव्य माध्यमांची भूमिका पाण्यासाठी किती महत्वाची आहे यावर श्री. अभिजित करंडे यांनी आपले मत व्यक्त केले. एखाद्या खेडेगावात पाणी नाही म्हणून तेथे त्या गावात मुलगी देण्यास कुणी तयार नाही. एवढे मोठे परिणाम पाण्याच्या टंचाईमुळे निर्माण होतात. जलक्षारता ही मोहिम राबविण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे. एकाच वेळेला बघायला व ऐकायला मिळते चित्र पाहिल्यानंतर आपल्या भावना जागृत होतात. त्यामुळे टीव्ही हे प्रसारमाध्यम प्रभावी ठरते. लोकांनी केवळ माध्यमांवर अवलंबून न राहता स्वत आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे. पाणी संवर्धन संदर्भात काम करणे गरजेचे आहे. जलसाक्षरता संदर्भात ज्या व्यक्ती किंवा संस्थांनी काम केले आहे त्यात शिरपूर पॅटर्न, राळेगणसिध्दी, पोपटराव पवार, पाणी फाउंडेशन, नाम फाउंडेशन यांनी केलेले काम लोकांपर्यंत पोहचवणे गरजेचे असून ते आम्ही केले आहे असे मत करंडे यांनी व्यक्त  केले. पाण्याविषयक जे हिरो तयार झाले आहेत ते समाजापर्यंत पोहचवण्याचे काम सुरू आहे. एखाद्या  गावात पाण्याला सेलीब्रेटी स्टेटस देणार का ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रातील नद्यांची अवस्था काय आहे त्या किती दूषित






आहे हे दाखवून त्या कशा स्वच्छ करता येतील तसेच प्रत्यक्षात श्रमदान देखील आम्ही केले आहे. ८ मार्च महिलादिनी पाणी फाउंडेशन सोबत काम केले माध्यम म्हणून काही व्यक्ती सतत पाण्यावर काम करीत आहेत.

**संदीप सावंत :**

चित्रपटाद्वारे जलसाक्षरता करता येते या विषयावर श्री. संदीप सावंत यांनी आपले मत व्यक्त केले. नदी वाहते या चित्रपटात दाखवून ही वाहती नदी वाचायला पाहिजे. त्यासाठी योग्य पध्दतीने उपयोग, त्याचा शोध लावून चित्रपट तयार करता येतात. चित्रपटाच्या माध्यमातून जलसाक्षरता करता येते ते एक प्रभावी माध्यम आहे असे त्यांनी सांगितले.

श्री. सूर्यकांत राहाळकर यांनी माध्यमे आणि जलसाक्षरता या सत्राचे अध्यक्षपद भूषविले, त्यांनी रेडिओ, वृत्तपत्र, टिव्ही इतर प्रसारमाध्यमे जलसाक्षरतेचे चांगले काम करू शकताता असे मत व्यक्त केले. विद्यार्थी हा घटक जलसाक्षरता चांगल्या प्रकारे करू शकतो त्याच्या माध्यमातून सर्वे करून कुठे नळ गळती आहे का याची माहिती करून निदर्शनास आणून देतात तसेच विद्यार्थ्यांनी पाण्याची बचत करण्यासाठी वॉटर बँक निर्मिती करणे गरजेचे आहे. पाण्याचे जुने स्त्रोत पुन्हा जीवंत करून त्याचा वापर करणे त्यासाठी माध्यमांचा वापर करावा. आपल्या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून श्री. राहाळकर यांचे जलसाक्षरतेचे कार्य सतत सुरू आहे.






**श्री. वसंतराव ठाकरे, डॉ. धनंजय नेवाडकर, डॉ. सर्जेराव भामरे, श्री. योगेश राऊत, डॉ. संजय पाटील, श्री. संजय झेंडे, डॉ. जितेंद्र तलवारे जलदिंडीचे पूजन करतांना**





# जल उत्पादकता

**प्रा. डॉ. संजय पाटील**



**सत्राचे अध्यक्ष : श्री. डी.एस. कुलकर्णी**
**वक्ते : श्री. चैत्राम पवार, डॉ. शिवाजी सांगळे,**
**श्री. प्रदीप भलगे**

आदर्शगाव निर्मीतीत योगदान देवून बारीपाड्याचे नाव राष्ट्रीय पातळी वर पोचविणारे श्री. चैत्राम पवार यांनी ह्या चर्चासत्रात पाण्याचा उत्पादक वापर यावर भाष्य केले. ते म्हणाले की, बारीपाडा हा दुर्गम भागातील पाडा आहे. १९९२ सालापासून या गावाच्या विकासाचे स्वप्न पाहत आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बनवासी कल्याण आश्रमाच्या संपर्कात आलो. गावातील लोकांना एकत्रित करून, सोबत घेवून वनसंवर्धन, जलसंवर्धन व श्रमदान या त्रिसूत्री कार्यक्रमाचा अवलंब करून बारीपाड्याचा कायाालट करण्याचा प्रयत्न केला आहे व लोकांच्या मनाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न सुरू केला. जलसंवर्धन करण्यासाठी विविध संघटनांचे सहकार्य लाभले. यापैकी जनसेवा फाउंडेशन पुणे व देशबंधू मंजू गुप्ता फाउंडेशनच्या सहकार्याने जलसंवर्धन कार्य करित राहिलो. विकासासाठी पाय बिंदूवर लक्ष केंद्रीत कले. त्यामुळे गवाचा सर्वांगीण विकास घडून आला व गाव संघटित होण्यास मदत झाली. गावाच्या संघटित होण्याने, त्यांच्या श्रमदानातून ४ बांध बांधले. ११०० एकर जमिनीवर वनसंवर्धन, मातीची




अडवणूक, १ पाझर तलाव, सामुदायिक विहीरी इत्याची गोष्टींवर भर देवून संपूर्ण गावाच्या श्रमदानाने, मदतीने विकासाची वाटचाल अखंडपणे चालू ठेवली. अशा प्रकारच्या जलसंवर्धनाच्या कार्यामुळे विकासाची वाटचाल अखंडपणे चालू ठेवली. आता लगतच्या पाच गावांना पाणीपुरवठा करून त्या गावांचाही पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. या सर्व उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेती विकासाचे महत्व वाढण्यास मदत झाली. सद्यस्थितीत बारीपाड्यात ४८ प्रकारची पिके घेती जातात. स्ट्रॉबेरीचेही उत्पादन येथील शेतकरी घेत आहेत. १२० वनभाज्या येथे उलब्ध आहेत. बारीपाड्याचेएक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे विद्यापीठाचा सहभाग वाढत आहे. संशोधनासाठी विद्यार्थी येथे येत आहेत, जैवविविधता हा घटक येथे अस्तित्वात आहे. ग्रामस्थ व वनविभाग यांना सोबत घेवून गावाचा विकास साधणे शक्य झाले. त्यामुळे गावातील दारिद्र्य, कुपोषणाचे प्रमाण, उपासमारीची संख्या कमी होण्यास मदत झाली. सर्व ग्रामस्थामध्ये कामासंबंधी अभिरूची निर्माण होवून रोजगाराचे प्रमाण वाढण्यास मदत झाली. दुबार पिक पध्दती घेण्यास सुरूवात झाली. स्ट्रॉबेरीच्या लागवडीमुळे लोकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली. देशबंधू व मंजू गुप्ता फाउंडेशनच्या वतीने १० सामुदायिक विहीरींची निर्मिती झाली. व सामुदायिक पिक उत्पादनाला सुरूवात झाली. सद्यस्थितीत गावातील मुबलक पाणीसाठ्याचा विचार करता ५० टन तांदुळ निर्यात करण्याचा विचार असल्याचे त्यांनी येथे नमूद केले आहे. वरील सर्व प्रकारामुळे लोकांमध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण

होवून स्थिर विकास दिसू लागला व साधनसंपत्तीची निर्मिती गावातच होवू शकते. हे पारीपाड्याचा नवकल्पनेतून दिसून येत आहे.

**२. अर्थशआस्त्राच्या दृष्टीने पाण्याची उत्पादकता : डॉ. शिवाजी सांगळे :** जल व भूमी व्यवस्थापनाचे अभ्यासक डॉ.शिवाजी सांगळे यांनी अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाण्याची उत्पादकता या विषयावर आपले मत व्यक्त केले. पाणी ही सामाजिक वस्तू बरोबर आर्थिक वस्तूही आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाण्याचा वापर उत्पादक कार्यासाठी करणे गरजेचे आहे. विकासाच्या दृष्टीने पाणी सर्वांसाठी उपलब्ध होणे गरजेचे आहे व तसेच ते दायित्व आहे. म्हणूनच पाण्याला एक वस्तू संबोधणे गरजेचे ठरते. निसर्गाकडून उपलब्ध असलेले सर्व पाणी लोकांपर्यंत पोहचविले गेले पाहिजे. उपलब्ध पाण्याचा समतोल पाण्याची



मागणी व पाण्याचा पुरवठा या तत्वानुसार साधणे गरजेचे आहे. पाण्याच्या बाबतीत सामाजिक कल्याणाची संकल्पना रूजवायला हवी. कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पदाकता कशी घ्यावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे ठरते. यासाठी पिकांच्या रचनेत बदल करणे गरजेचे असते. पाण्यावर आधारित अर्थशास्त्रीय मुलतत्वे उभी करणे काळाची गरज आहे. पाण्याच्या संग्रहासाठी होणारे खर्च जास्त आहे. त्यामानाने त्याचा वापरापासून मिळणारे उत्पन्न हे कमी आहे. या सर्वांवर मात करण्यासाठी पाण्यावर वेगवेगळी संशोधने व्हावीत, ग्रामीण भागावर वेगवेगळ्या पाणी व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्या देण्यात याव्यात, विद्यापीठ तेथील महाविद्यालयाने पाणी वापरासंबंधी, त्याच्या पुनर्वापरासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी स्कील डेव्हलपमेंट सारख्या शिक्षणावर भर देण्यात यावा. पाणी वापराची पध्दत विकसित व्हावी, दुर्मिळ पाण्याच्या योग्य नियोजनाच्या आधारे वापर होणे गरजेचे आहे. पाण्याचा उपयोग पैश्यात पाहू नये तर सामाजिक पैलूच्या दृष्टीने पाहावे. पाणी हे समग्र अर्थशास्त्राच्या संकल्पनेत येते. पाण्याचा अपव्यय होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेवून पाण्याचे व्यवस्थापन केले तर पाण्याची टंचाई कधीच भासणार नाही. असे त्यांनी सांगितले विद्यार्थी विविध क्षेत्रात पदवी घेतात मात्र, ही पदवी घेत असताना समाजात जलसाक्षरता होईल या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत असे आवाहन त्यांनी येथे उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

**३. सिंचनार्यक्षमता वाढविण्याचा प्रयोग – श्री. प्रदीप भलगे :**

औरंगाबाद येथील वाल्मीचे प्रदीप भलगे यांनी पिकाची उत्पादकता वाढविण्याबाबत उपस्थितांना माहिती दिली. यात त्यांनी सांगितले की, साठवणूक केलेल्या पाण्याचा कार्यक्षम वार होणे आवश्यक आहे. पिकांच्या मुळांना पाणी नाही तर ओलावा हवा असतो. प्रत्येक मातीची ओल धरून ठेवण्याची क्षमता वेगवेगळी असते. मातीचा पृष्ठभाग ओला असावा लागतो. त्यासाठी पिकांना ओल धरून ठेवण्यासाठी आच्छादन करणे गरजेचे असते. रोपांच्या मुळाचे वजन १३ ग्रॅम इतके असते. यासाठी त्यांनी अनेक स्लाईडद्वारे वास्तविक माहिती दिली. दोन पिकाच्या मध्ये नांगरटी करावी, त्यामुळे सेंद्रीय पदार्थ वाहून जमीन सुपीक होण्यास मदत होते. जमिनीत सेंद्रीय पदार्थ टाकण्याचे फायदे




विविध आहेत. यात जमिनीत ओलावा टिकण्यास मदत होते. पाणी जमिनीत मुरते. यासाठी त्यांनी पुणे जिल्ह्यातील उखेड येथील प्रयोग स्लाईडद्वारे दर्शविला. पावसाचे पडणारे पाणी जमिनीत अडविल्यास ते पिकांना उपलब्ध करून ठेवावे. मातीचा ओलावा वाढावा म्हणून भूपृष्ठाखाली सिंचन पुरवठा वाढवावा. पावसाचे पडलेले पाणी जमिनीत जिरवण्यासाठी पिकांची उत्पादजकता वाढविणे शक्य होते. अशा प्रकारे मातीला ओलावा टिकविण्यासाठीच्या तंत्रज्ञानाची माहिती श्री. प्रदीप भलगे यांनी दिली.

**सत्र अध्यक्ष : श्री. डी.एस .कुलकर्णी :** जळगाव येथील तापी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री. डी.एस .कुलकर्णी म्हणाले की, सांडपाण्यावर प्रक्रिया करून या पाण्याचा उपयोग शेतीसाठी चांगल्याप्रकारे करता येवू शकतो. जल उत्पादकता व उत्पन्न यांच्यात समन्वय साधणे गरजेचे आहे. पाण्याचा पर्यायी वापर करण्यासाठी पाण्याचा कार्यक्षमतेने वापर होणे गरजेचे आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर करून शेती उत्पादन वाढविण्यास शेतकऱ्यांनी भर द्यायला हवा. डॉ. सांगळे हे माझे शिक्षक आहेत व त्यांनी मला औरंगाबद येथे ट्रेनिंग दिले आहे. डॉ. सांगळे यांनी किंमत व मूल्य यातील फरक सांगितला. श्री. चैत्राम पवारांचे काम वाखाणण्याजोगे व लोकांनी आदर्श घेण्यासारखे आहे. त्यांची पंचसूत्री योजना चांगली आहे. चैत्राम पवार, अण्णा हजारे, पोपटराव पवार, वसंत ठाकरे यांचे जलसंवर्धनासीचे कार्य समाज विकासासाठी उत्तम दर्जाचे आहे. देशातील उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने पाण्याचे महत्व भविष्यकाळात महत्वपूर्ण ठरतील. अधिकाऱ्यांनी याची दखल घेवून समाजकार्याच्या या कामाचा लाभ घेण्यात यावा.







विविध मान्यवरांचे स्वागत





मंडळाचे सचिव श्री. गजानन देशपांडे जलदिंडी चे पूजन करतांना




संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करणारे श्री. राहुल ठाकरे आणि श्री. सदाशिव सूर्यवंशी यांनी उत्कृष्ट संचलन केल्याबद्दल त्यांचा सत्कार

# समारोप समारंभ दिनांक २१ जानेवारी, २०१८

**श्री. संजय झेंडे**

**प्रमुख पाहुणे : श्री. अविनाश सुर्वे**
**समारोप सत्राचे अध्यक्ष : डॉ. माधवराव चितळे**

अकराव्या जलसाहित्य संमेलनाचे आयोजन दिनांक २० आणि २१ जानेवारी, २०१८ रोजी धुळे शहरात करण्यात आले होते. पांझरानदीच्या काठावर वेदांत मंगलकार्यालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या **देशबंधू गुप्ता नगरीत** हे संमेलन भरविण्यात आले. या नगरीत स्थापित **जलअभ्यासक मुकुंद धाराशिवकर** मंचावर दोन दिवसांच्या कालावधीत पाण्याशी निगडित विविध विषयांवरील चर्चासत्रे, मुलाखती, कवि संमेलन असे भरगच्च कार्यक्रम झाले. उद्घाटनाच्या आधी काढण्यात आलेल्या जलदिंडीमुळे चैतन्य निर्माण झाले. तर समारोपप्रसंगी आंतरराष्ट्रीयख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराच चितळे यांच्या अध्यक्षीय भाषणाची लाभलेली बौध्दिक मेजवानी जलसाक्षरतेच्या कक्षा व समज रुंदावणारी ठरली. भविष्यातील जलसाहित्य संमेलनांच्या आयोजनाच्यादृष्टीने माधवरावांचे भाषण मार्गदर्शक ठरले. समारोप समारंभासाठी विदर्भ सिचंन विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अविनाश सुर्वे, सिंचन सहयोग परिषदेचे डॉ.दि.मा. मोरे, डॉ.शिवाजी सांगळे, तापी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक एस.डी. कुळकर्णी, संमेलनाचे स्वागताध्यक्ष रावसाहेब बढे, भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर, सचिव गजानन देशपांडे, धुळे शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे आणि संमेलनाचे सचिव प्रा.डॉ.संजय पी. पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.



पाण्याशी नातं बदललं .

धुळे शहरात अकरावे जलसाहित्य संमेलन भरले. या संमेलनापासून नवीन स्फूर्ती आपण घेऊन जाणार आहोत. जल जागृतीची लाट केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादीत नसून जगभर आलेली ही लाट आहे. पाणी आणि पर्यावरण हा निकट संबंध असलेला विषय आहे. पर्यावरण संतुलन हे पाण्याचं व्यवस्थापन कसं होते यावर अवलंबून आहे. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारे अनेक कार्यकर्ते आहेत, संस्था आहेत. त्यांचेही दरवर्षी जलसंमेलन होत असतं. सन २०१७ मध्ये शिकागो येथे झालेल्या जल संमेलनात जगभरातून तब्बल २२ हजार ८६० अभ्यासक सहभागी झाले होते. त्यामुळे संयोजकांना सहा स्वतंत्र ठिकाणी व्यवस्था

करुन चर्चा घडवून आणावी लागली.

आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणामध्ये आपलं पाण्याशी नातं बदललं. त्या बदलेल्या नात्याच्या अनुषंगाने आपल्या व्यवस्था कशा बदलल्या पाहिजे, जाणिवा कशा बदलल्या पाहिजे, त्यासाठी जलसाहित्य संमेलनाचा उपयोग होतोय.

आपल्याकडे धरण आणि कालवे याव्दारे पाणी पुरवठ्याची व्यवस्था आहे. औद्योगिक आणि मानवी पाणी पुरवठा सोडला तर आपण नळप्रणाली फारशी वापरली नव्हती. आता आपण ज्या गतीने देशाचे स्थितंतर करतो आहोत, त्यात शेती व्यवस्थेमध्ये लवकरच नळप्रणाली येणार आहे. या नव्या व्यवस्थेचे संतुलन हाताळण्यासाठी, त्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक व्यवस्थेच्या उपलब्धतेसाठी यापुढील जलसाहित्य संमेलनांमध्ये अधिक खोलात विचार करावा लागणार आहे.

पाण्याची गुणवत्ता हा फारसा प्रकाशात न आलेला विषय आहे. मानवी आरोग्याशी संबंधित असलेल्या या विषयासंदर्भात पुरेशी जाणीव निर्माण झालेली नाही. त्याचप्रमाणे हा विषय आपल्या पशूधनाच्या दूध देण्याच्या क्षमतेच्या दृष्टीने देखील महत्वाचा आहे कडे आपण फारसे लक्ष दिलेले नाही.

पाण्याचा पुनर्वापर हा दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. पाण्याचा पुनर्वापर आपण किती प्रमाणात करु शकू आणि त्याची व्यवस्था बदलवू शकू यावर विकासाची प्रगती अवलंबून राहणार आहे. पुढच्या संमेलनात या विषयाच्या अनुषंगाने चर्चा ठेवण्याचा प्रयत्न व्हावा.

आपण एक निर्यातदार देश आहोत. निर्यातदार देश म्हणून काम करताना आपणांस आर्थिक बंधने पाळणे जसे आवश्यक आहे, तसेच जागतिक गुणवत्तेचे जे निकष ठरले आहेत त्या गुणवत्तेला उतरणे शक्य व्हावे यासाठी आपणाला गुणवत्ता प्रधान वेगळी व्यवस्था निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. याकडे ग्रामीण समाज फार मंद गतीने वळतोय. त्यासाठी वेगळ्या वित्तीय व्यवस्था, प्रशिक्षण व्यवस्था, सामाजिक जागृती व्यवस्था तयार कराव्या लागतील.

जागतिक स्पर्धेत आपला स्पर्धक देश असलेला चीन देखील आपल्या सारखाच उष्ण आणि कोरडया हवेचा देश आहे. तथापि चीन ने हरित गृहांची निर्मिती करण्यात आघाडी घेतली आहे. ज्या प्रमाणात ग्रामीण जीवनात हरित गृहांची निर्मिती होईल, त्याप्रमाणात कमी पाण्यात अधिक उत्पादनाचं आपलं उद्दीष्टय हस्तगत होण्यास मदत होईल. एका घनमीटर पाण्यात किती उत्पादकता वाढावी याचे जे आंतरराष्ट्रीय निकष आहेत त्याच्यामध्ये आपण खूप मागे आहोत. त्यामुळे हरित गृहांकडे ग्रामीण भाग वळविणे आणि पुनर्वापरासंदर्भात प्रबोधन यामुद्यांकडे यापुढील काळात जल संमेलनांच्या व्यासपीठावरुन विचार होणे गरजेचे आहे. कारण हवामानातील दोलायमानतेला आपण हरित गृहांच्या निर्मितीमुळे अंशत: उत्तर देऊ शकतो.

जलव्यवस्थापनामध्ये केवळ पाणी, पाण्याची कार्यतत्वे आणि पाण्याची गुणवत्ता एवढ्याच बाबी मर्यादित राहणार नाहीत. या बाबी कार्यकुशल करता येतील, कमीत कमी उर्जेमध्ये पाण्याचे वहन कसे करता येईल यादृष्टीने या पुढील काळातील संमेलनांमध्ये चर्चासत्र व्हावीत.

पाण्याची आजची जी दु:स्थिती आहे, त्यास अनेक कारणे आहेत. त्या अनेक कारणांपैकी शासकीय प्रणालीतून चालणारी वितरण व्यवस्था हे एक कारण आहे. सार्वजनिक व्यवस्थांमध्ये काही दोष आहेत. नकळत राजकीय दबाव जास्त असतो. त्यामुळे त्यातील गुंतवणूक, दरवर्षीचा देखभाल दुरुस्ती खर्च, व्यवस्थापनाचा खर्च आपण वसुल करत नाही. परिणामी शासन व्यवस्थेवर व करप्रणालीवर त्याचा भार पडतो. तो आपणांस कमी करायचा आहे. यासाठी इजिप्त सारख्या देशाने नाईल नदीच्या पाणी वितरणासाठी साठी आणि त्यासाठी येणा–या खर्चाच्या वसुलीसाठी कठोरपणे राबविलेल्या धोरणाचा अंगीकार करण्याची गरज आहे.

शासनावर पूर्णभार टाकण्याच्या मधल्या काळात रुढ झालेल्या मानसिकतेतून आपणाला बाहेर पडायचे आहे. आपल्या देशाला वित्तीय विस्कळीतपणा देणारी ही बाब आहे. स्वावलंबी आर्थिक वित्तीय निकषांवर सुस्थिर उभी राहिलेली, शासकीय कर प्रणालीवर अवलंबून नसलेली अशी वित्तीय व्यवस्था आपल्याला शेती, नागरी आणि औद्योगिक पाणी पुरवठ्यासाठी निर्माण करायची आहे. यापुढील जलसाहित्य संमेलनांमध्ये शेतीचे अर्थशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र याविषयांच्या अनुषंगाने चर्चा होणे आवश्यक आहे.

आपण विकासासाठी भांडवली पाठपुरावा करण्याच्या मागे लागलो आहोत. मात्र वसुली करण्यासाठी जे सामाजिक कौशल्य पाहिजे , जो कठोरपणा पाहिजे त्यात आपण कमी पडतो आहोत. वित्तीय पुरवठा आणि त्याची वसुली जेवढ्या कुशल व्यवस्थेवर आधारित होईल तेवढी विकासाची व्यवस्था चांगली होणार आहे. पाणी हा जेवढा सामाजिक विषय आहे, तेवढाच आर्थिक देखील आहे. सिंचनासाठी अथवा पिण्यासाठी पाणी वितरणावर होणारा खर्च आपण वसुल करु शकत नाही. हा कचा दुवा देशाच्या अर्थव्यवस्थेवर अनावश्यक भार टाकण्यास कारणीभूत ठरतो आहे.

पाण्याची उपलब्धता केवळ विकासाचा निकष होऊ शकत नाही. गंगानदी खोऱ्यात पाणी विपुल आहे आणि ते सहज उपलब्ध आहे. तथापि,राष्ट्रीय दृष्टीने गंगाखोरे सर्वात गरीब खोरे आहे. याउलट परिस्थिती आसाम मध्ये आहे. गेल्या काही वर्षात आसाम ने सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. महाराष्ट्रातील उंच व कमी पावसाच्या प्रदेशांमध्ये अशी आत्मनिर्भरता निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी पाणी व्यवस्था विकेंद्रीत करण्याच्या हेतूने जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तांत्रिक व वित्तीय वसुली क्षमता निर्माण करावी लागणार आहे.

अर्थशास्त्रातील पाण्याचं स्थान अथवा पाण्याच्या क्षेत्रात अर्थशास्त्राचं स्थान हे जागतिक मंचावर कळीचे मुद्दे आहेत. त्यामुळे यापुढील काळात केवळ अर्थशास्त्राचा अथवा केवळ जलविज्ञानचा विकास करुन चालणार नाही तर या दोघांची सांगड घालणारा तज्ञांचा मंच, समुह आपल्याला निर्माण करावा लागणार आहे, त्यासाठी पुढील जलसाहित्य संमेलनामध्ये विचार व्हावा अशी अपेक्षा डॉ.माधवराव चितळे यांनी व्यक्त केली.

**श्री. अविनाश सुर्वे :**

मूळ धुळेकर असलेले विदर्भ सिंचन विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अविनाश सुर्वे याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनी देखील उपस्थितीतांना संबांधित केले . ते म्हणाले : गेल्या



२० ते २५ वर्षात राज्यात ज्या मोठया जल प्रकल्पांची कामे घेण्यात आली त्यासाठी कोटयावधी रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतू हे प्रकल्प अजूनही पूर्ण झालेले नाहीत. परिणामी शेतकरी पाण्यापासून वंचितच आहेत. जे प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. त्यासाठी निधीची कमतरता पडते. तर काही ठिकाणी शासकीय धोरणांमुळे काम रखडले आहे. त्यामुळे शासकीय सेवेत काम करत असताना प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्यामूळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य पाहू शकलेलो नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

शेतकरी हिताच्या दृष्टीने शासनाने अनेक जलप्रकल्प राबविण्याचे ठरविले. परंतू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कमीत कमी २० ते ३० वर्षाचा कालावधी लागत असतो. त्यात निधीची अडचण, प्राधान्यक्रम शासकीय धोरण या बाबी विचारात घेता प्रकल्पाचे काम रखडते. परिणामी धरणांपासून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहचविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. खरीपाचं अथवा उन्हाळी पीक घेऊन सिंचनाचा लाभ घेता येत नाही. २० ते ३० वर्षाच्या कालावधीत एक पिढी लुप्त होते. पाणी शेतापर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नात जनाचा विचार होतो परंतू मनाचा विचार होत नाही. यासंदर्भात संबंधितांच्या जाणीवा तीक्ष्ण करण्याचे काम अशा संमेलनांमध्ये व्हावे अशी अपेक्षा अविनाश सुर्वे यांनी व्यक्त केली.

**विदर्भात १ लाख हेक्टरवर पाणी देण्याचा उद्देश :**

विदर्भातील १ लाख हेक्टरवर पाणी देण्याचा उददेश आहे. त्यामूळे मोठया प्रमाणात क्षेत्र हे सिंचनाखाली येणार आहे. या कामांतर्गत धरण कालवे उपकालवे व बांध बांधण्यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात पैसा खर्च केला जाणार आहे. हे काम ज्या एनजीओ मार्फत केले जाणार आहे त्या यंत्रणेतील सदस्यांना भारतीय जलसंस्कृती मंडळाने प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणामूळे विदर्भात चांगले काम होणार असून यासाठी सेवाभावी संस्थांप्रमाणेच प्रत्येक घटकाने या यज्ञात योगदान देणे महत्वाचे आहे असे त्यांनी येथे सांगितले.



**संमेलनात संमत झालेले ठराव :**

अकराव्या जलसाहित्य संमेलनाचे सचिव प्रा.डॉ.संजय पी. पाटील यांनी मांडलेले ठराव यावेळी संमत करण्यात आले . यामध्ये खालील ठरावांचा समावेश आहे.

पांझरानदीच्या खोऱ्यातील सिंचनाच्या लोकसहभाग असलेल्या प्राचीन फड पध्दतीस जागतिक वारसा असा दर्जा मिळावा.

धुळे जिल्ह्याची विकास वाहिनी असलेली पांझरा नदी बारमाही व्हावी यासाठीच्या प्रस्तावास केंद्र व राज्य सरकारने मान्यता द्यावी.

कायम अवर्षण प्रवण क्षेत्रात येणाऱ्या धुळे जिल्ह्याचे दैन्य कायमस्वरुपी मिटावे यासाठी जिल्ह्यातील पडीत जमीनीवर कुरण विकासाचा कार्यक्रम धडक पध्दतीने राबवावा.




तापी नदीवर उभारण्यात आलेल्या प्रकाशा, सारंगखेडा आणि सुलवाडे बंधाऱ्यांमध्ये साठविण्यात आलेली पाणी वापरण्याची पध्दती सुचविण्यासाठी राज्य शासनाने तज्ञांची समिती नेमावी.

स्थानिक व परकीय भाषांमध्ये उपलब्ध असलेले पाणी प्रश्नांसंबंधीचे साहित्य अनुवादित करुन ते समाजापर्यंत पोहचविण्यसाठी भारतीय जलसंस्कृती मंडळ या पुढील काळात विशेष प्रयत्न करण्याचा मानस व्यक्त करते. त्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ समाजाने अथवा शासनाने उपलब्ध करुन द्यावे.

सर्व विद्यापीठांतून पाण्याचे आयोजन, नियोजन व संयोजन करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व विद्याशाखांमधील अभ्यासक्रमात पाण्यासंबंधीच्या व जलसाक्षरतेसारख्या विषयांचा समावेश करावा.

अकराव्या जलसाहित्य संमेलनाच्या आयोजन व नियोजनात महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या देशबंधू व मंजू गुप्ता फाउंडेशनच्या अभिनंदनाचा ठराव यावेळी करण्यात आला.

******

# जलसाहित्य संमेलन - आशा आणि आकांक्षा

**श्री. गजानन देशपांडे,**
**सचिव, भारतीय जल-संस्कृती मंडळ**



**जलसाहित्य संमेलन - आशा आणि आकांक्षा**
**गजानन देशपांडे,**
**सचिव, भारतीय जल-संस्कृती मंडळ**

नुकतेच अकरावे अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन धुळे येथे २०-२१जानेवारी २०१८ दरम्यान उत्साहात संपन्न झाले. अनेकांचे डोळे या संमेलनाकडे मोठ्या अपेक्षेने खिळलेले होते. सर्वांच्या जिव्हाळ्याच्या आणि जीवनाशी निगडीत पाणी हा विषय समोर ठेऊन अनेक विषयावर चर्चा करण्यासाठी नामवंत तज्ज्ञ मंडळी, साहित्यिक, जलकार्यकर्ते या निमित्त एकत्र आले होते आणि संमेलनाच्या दोन दिवसांच्या कालावधीत आशयसंपन्न अशी साधकबाधक स्वरूपातील चर्चासत्रे संपन्न झाली.

जलसाहित्य संमेलन ही भारतीय जल-संस्कृती मंडळाने लोक प्रबोधनास्तव रूढ केलेली एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. आतापर्यंत अशी ११ संमेलने विविध ठिकाणी घेण्यात आली. ही संमेलने आयोजित करण्यामागे भारतीय जल-संस्कृती मंडळाने निश्चित अशी काही उद्दिष्टे आखलेली असतात. तद्वतच त्यामागे एक भूमिका असते. समाजात उद्भवलेल्या पाण्यासंदर्भातील विविध समस्यांकडे त्या भागातील लोकांचे लक्ष आकर्षित करणे, त्याबाबत त्यांचे सुयोग्यरितीने प्रबोधन करणे आणि अंतिमत: त्यातून एक चळवळ निर्माण करून लोक सहभागातून तो प्रश्न मार्गी लावणे असा सर्वसाधारण विचार त्यामागे असतो. त्यादृष्टीने धुळे येथे पार पडलेल्या ११ व्या जलसाहित्य संमेलनाचा संमेलनपश्चात पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने आढावा घेणे आवश्यक ठरते.

**संमेलनाचे उत्तम आयोजन:**

हे संमेलन यशस्वी व्हावे यासाठी देशबंधू आणि मंजू गुप्ता फाऊंडेशनने तन-मन-धन पूर्वक सर्व प्रकारचे सहाय्य दिले आणि भारतिय जलसंस्कृती मंडळाने आखणी केलेल्या कार्यक्रमास बळ देऊन ते यशस्वी केले. नुकत्याच स्थापन झालेल्या मंडळाच्या धुळे शाखेसाठी त्यांचे सहाय्य एक वरदानच ठरले. तथापि, या शाखेने पुढील कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी अधिक संघटन शक्ती स्वबळावर उभी करणे आवश्यक आहे.

संमेलनात अनेक परिसंवाद, चर्चासत्रे संपन्न झाली. यात डॉ.माधवराव चितळे यांची विशेषत्वाने आयोजित केलेली खुली मुलाखत जनमानसावर आत्यंतिक प्रभाव टाकणारी ठरली. तसेच जलयुक्त शिवार योजनेतील लोक सहभाग, खान्देशची जलसंस्कृती, युवा पिढी आणि पाणी, माध्यमे आणि जल साक्षरता, जल उत्पादकता आदी विषयांवरील चर्चासत्रे आशय संपन्न होती. यातील वक्ते आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन प्रेरणादायी आणि उपयुक्त वाटले.

काही सत्रांमधून कृषीविषयक मार्गदर्शनही प्राप्त झाले. तथापि, मंडळाच्या परिवारातीलच सिंचन सहयोग या संस्थेमार्फत कृषी आणि सिंचन हा विषय प्रभावीरित्या मोठ्या प्रमाणात हाताळला जात असल्याने भारतीय जलसंस्कृती मंडळाने कृषी हा विषय वगळून इतर विषयांवरच आपल्या कार्यक्रमाची दिशा केंद्रीत ठेवावी, असे प्रांजळपणे वाटते.

**इंटरनेटच्या माध्यमातून संमेलनाचे सरळ प्रक्षेपण :**

या संमेलनात प्रथमच माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करण्यात आला. जलसंमेलनांत जास्तित जास्त लोकांनी सहभागी व्हावे अशी संमेलनाच्या आयोजकांची नेहेमिच महत्वाकांक्षा असते. संमेलनातील प्रत्यक्ष उपस्थितीस केव्हाही एक मर्यादा ही राहणारच. आणि त्यामुळे संमेलनांचा प्रत्यक्ष लाभ हा तेथे उपस्थित जलप्रेमींपुरताच मर्यादित राहत असल्याने त्यातील प्रभाव समाजात पुरेशा प्रमाणात पसरवणे यास साहाजिकच काही मर्यादा पडतात. तथापि, या वर्षी प्रथमच संमेलनाच्या सरळ प्रक्षेपणाची व्यवस्था इंटरनेटच्या माध्यमातून करण्यात आलेली होती. ही गोष्ट भविष्यातील संमेलनासाठी अत्यंत उपयुक्त आणि महत्वपूर्ण अशी बाब ठरणार आहे, यात शंका नाही. यामुळे संमेलनात दुरस्थ लोकांना सहभागी होऊन लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. पुढील संमेलनांसाठी अशा प्रकारे इंटरनेटच्या माध्यमातून सरळ प्रक्षेपण करून भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या जिल्हावार शाखातील कार्यकर्ते आणि त्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांतून हजारोच्या संख्येने लोक या संमेलनाशी कसे जोडल्या जातील यावर अधिक लक्ष दिल्यास कार्याचा प्रसार करण्याच्या दृष्टीने ते अधिक उपयुक्त ठरेल.

**संमेलने केवळ प्रतिकात्मक ठरू नयेत :**

अशी संमेलने आयोजित करण्यामागे मंडळाचे तसेच स्थानिक सेवाभावी संस्थांचे मोठ्या प्रमाणात परिश्रम, वेळ आणि पैसा कारणी लागलेला असतो. या संमेलनासाठी आ. डॉ. माधवराव चितळे, डॉ. दि.मा. मोरे यांजसारखे महनीय जलतज्ज्ञ आणि इतर अनेक तज्ज्ञ विचारवंतांना आमंत्रित करण्यात आले होते. ही सर्व तज्ज्ञ मंडळी अत्यंत व्यस्त असूनही संमेलनासाठी मार्गदर्शन करण्यासाठी आवर्जून उपस्थित झालेले होते. संमेलनासाठी हा अलभ्य लाभ समजावयास हवा. या तज्ज्ञांचे त्यांच्या व्यस्ततेमुळे वारंवार येणे शक्य होणारे नसते. त्यादृष्टीने अशा मान्यवर तज्ज्ञांच्या भेटीचे / मार्गदर्शनाचे महत्व सुयोग्यपणे ओळखून त्यांच्या मार्गदर्शनाचा यथोचित लाभ पदरी पाडून घेत समाज परिवर्तनाच्या कार्यात त्याचा सुयोग्य वापर कसा करून घेता येऊल याबाबत प्राथम्याने विचार झाला पाहिजे. यासाठी मंडळाच्या स्थानिक शाखेने संमेलनपश्चात अधिक सक्रीय होणे ही महत्वाची आणि गरजेची बाब ठरते. अन्यथा या संमेलनांत प्राप्त झालेले हे उच्च कोटीचे मार्गदर्शन हवेतच विरून जाण्याचा धोका शिल्लक राहतो. त्यामुळे ही संमेलने केवळ प्रतिकात्मक न ठरू देता सामाजिक परिवर्तनासाठी त्याचा हेतूपुर:स्सर वापर करून घेणे ही धुळे शाखेसाठी एक कसोटीच म्हणावी लागेल.

**सामाजिक परिवर्तन प्रक्रीयेतील तिन पायऱ्या / टप्पे :**

भारतीय जलसंस्कृती मंडळाने पाणी विकासासंदर्भात जे सामाजिक कार्य अंगिकारलेले आहे त्यात इच्छीत सामाजिक परिवर्तन कसे घडून येईल याबाबत मंडळाच्या सुस्पष्ट अशा संकल्पना आहेत. आ. डॉ. माधवराव चितळे यांनी धुळे संमेलनातील त्यांच्या प्रकट मुलाखती दरम्यान समाज परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रीयेत अंतर्भूत असणाऱ्या तिन पायऱ्यांबाबत अत्यंत मार्मिक पद्धतीने विवेचन केले. १) प्रबोधन २) संघटन ३) उपक्रम आणि नंतर परिवर्तन अशा क्रमानी हे परिवर्तन प्रक्रीयेतील तिन टप्पे / पायऱ्या आहेत. त्याबाबत खाली थोडक्यात विवेचन करीत आहे.

**प्रबोधन :** कुठलाही सामाजिक उपक्रम हाती घेत असतांना सर्व प्रथम गरज असते ती म्हणजे त्या उपक्रमाबाबत पर्याप्त लोकप्रबोधनाची. लोकांमध्ये जाऊन मोठ्या प्रमाणावर लोकप्रबोधनाचे कार्यक्रम राबवणे आणि त्या प्रश्नी लोकजागृती करून कृतिशिल सामाजिक सहभागाच्या आवश्यकतेबाबत त्यांच्यात पुरेशी सजगता निर्माण करून त्यांना सहभागासाठी प्रवृत्त करणे हा त्यातील प्रबोधनाचा पहिला टप्पा. हे सर्व लक्षात घेता धुळे येथील जलसाहित्य संमेलन हे परिवर्तन प्रक्रीयेच्या पहिल्या टप्प्यावरील लोक प्रबोधनाचा भाग ठरते.

**संघटन :** हाती घ्यावयाच्या विशिष्ट उपक्रमाबाबत पर्याप्त प्रमाणात लोकप्रबोधनपर कार्यक्रम प्रभावीपणे राबविल्यानंतर परिणामस्वरूप अनेक लोक त्या उपक्रमाकडे आकर्षित होतात आणि ते त्या उपक्रमात सहभागी होण्यात त्यांचा कल निर्माण होते. अशा प्रभावित लोकसमुहातून त्या उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेले संघटन उभे करणे मग शक्य होऊ शकते.

**उपक्रम :** विशिष्ट प्रश्नी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्यानुसार विविध सामाजिक उपक्रमांची आखणी करून ते उपक्रम सातत्यपूर्वक यशस्वीपणे राबविणे, हे या टप्पयावरील काम. त्यानंतर समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल घडून येते.

परीवर्तन प्रक्रीयेतील ही मूळ तिन तत्वे नजरेसमोर ठेवत तीन पायऱ्यांवरून मार्गक्रमण करून आपल्याला समाज परिवर्तनाचे आपले इच्छित उद्दीष्ट साध्य करणे शक्य होईल.

**जलविकास कार्यासाठी सामाजिक बांधणी :**

अशा सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात जास्तित जास्त लोक मंडळाशी जोडले जावेत यासाठी धुळे शाखेने हिरीरीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. याकामी इतिहासतज्ञ, पुरातत्ववेत्ते, समाजशास्त्राचे अभ्यासक, मानसशास्त्रज्ञ, डॉक्टर्स, अभियंते, भूजल–शास्त्रज्ञ, संस्कृत–पाली अर्धमागधी तसेच विविध प्राचीन आणि देशी भाषांचे जाणकार, तळमळीचे कार्यकर्ते, दानशूर नागरिक अशा विविध क्षेत्रातील जाणकार संस्था व हौशी नागरीक इत्यादींचा अधिकाधिक सहभाग प्राप्त होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. या पुढील काळात धुळे शाखेस या सर्वांच्या मदतिने खाली दर्शविलेल्या संभाव्य क्षेत्रांत शिरकाव करून आपल्या सामाजिक कार्याचा विस्तार करावा लागेल.

**परिवर्तनाच्या प्रतिक्षेत असलेली काही जलक्षेत्रे :**

जलविकास क्षेत्रात सामाजिक परिवर्तनाची आस लावून बसलेली अनेक क्षेत्रे आज परिवर्तनाच्या प्रतीक्षेत आहेत. यासाठी उपरोक्त परिवर्तनाच्या पायऱ्यावरील सामाजिक बांधणीसाठी धुळे शाखेने येत्या काळात आपला नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करावा लागेल. त्यासाठी खाली काही संभाव्य क्षेत्रांची यादी द्ली आहे. मंडळाने आपल्या शक्तीनुसार त्यातील क्षेत्रांची निवड करून कार्यवाहीची दिशा निश्चित करावी आणि त्यानुसार आपल्या कामाची सुयोग्य आखणी आणि संघटन उभारून आपले कार्यक्रम राबवण्यास सुरूवात करावी.

धुळे शहरातून वाहणाऱ्या पांझरा नदीचे निर्मलीकरण / सौंदर्यीकरणाचे प्रयत्न लोक सहभागातून हाती घेणे.

धुळे जिल्ह्यातील पाणी प्रश्नांचा अभ्यास करून उपाययोजनांसदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी सभा, संमेलने, कार्यशाळा आणि परिषदा इत्यादींचे आयोजन करणे.

विशिष्ट पाणीप्रश्नांसंदर्भात जलजागृती अभियान सातत्यपूर्वक

राबवून लोकांच्या पाणी विषयक दृष्टीकोनात बदल घडवून आणणे आणि याकामी प्रयत्नरत असलेल्या समाजसेवी संस्थांचे सहकार्यासाठी जाळे विणणे.

पाणी प्रश्नाचे स्वरूप व व्याप्ती समाजमनावर बिंबविण्याकरिता प्रचार साहित्य, चित्रफिती यांची निर्मिती करणे, ललीत व वैज्ञानिक साहित्यास व इतर माध्यमांना प्रोत्साहन देणे.

भारताच्या इतिहासातील पाण्याच्या व्यवस्थापनाचे प्राचिन काळापासूनचे प्रयत्न, त्यातून विकसित झालेला सांस्कृतिक वारसा आणि त्याचे अध्ययन व जतन करण्यासंबंधीचे कार्यक्रम हाती घेणे.

पाणीप्रश्न सोडविण्यासाठी योजलेल्या जागतिक प्रयत्नांचा अभ्यास करून आपल्या जिल्ह्यात ते कितपत वापरले जाऊ शकतील याचा मागोवा घेणे.

**पांझरा नदीचे निर्मलीकरण व सुशोभीकरण :**

या जलसंमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे हे संमेलन धुळे शहराचे आभूषण असलेल्या पांझरा नदीच्या काठावर भरले होते. ही नदी एके काळी धुळे शहराची प्राणदायिनी राहिलेली आहे. आज जर्जर अवस्थेत असूनही काही प्रमाणात ती ते कर्तव्य अद्यापही निभावते आहे. फड सिंचन पद्धती सारखी २००० वर्षांपेक्षा अधिक मोठी वैशिष्ट्यपूर्ण परंपरा या नदीमुळे धुळ्यास लाभली आहे, जी एक ऐतिहासिक जागतिक वारसा म्हणून घोषित होण्याच्या प्रक्रीयेत आहे. या नदीचे मोठा विस्तार असलेले रूंद पात्र अतिशय सुंदर आणि मनोहारी असे आहे. नदीचे काठ तर शहरास अधिकच शोभिवंत करतात. नदीच्या दोन्ही बाजूने पसरलेल्या धुळे शहरासाठी अत्यंत भूषणावह अशी देणगीच नदीने शहराला आपल्या अस्तित्वाने बहाल केलेली आहे. असे दुर्मिळ भाग्य लाभलेले हे धुळे शहर आहे.

**पांझरा – धुळे शहराची सौंदर्यवती :**

लंडन आणि पॅरीस या सारखी जगात अनेक शहरे अशी आहेत की ते ज्या नदीच्या काठावर वसले आहेत त्या नदीमुळे त्यांची सुंदरता अधिक वाढली आहे. जसे लंडनची थेम्स आणि पॅरीसची सीन नदी तेथील सौंदर्यात मोठी भर घालतात आणि पर्यटकांसाठी ते मोठे आकर्षण ठरलेले आहे. धुळे शहरासही सौंदर्यवती पांझरेच्या रूपाने तशीच देणगी आणि सामर्थ्य लाभले आहे.

तथापि, आज पांझरेची अवस्था अत्यंत दयनीय अशी झाली आहे. शहरातील गटारींतून वाहणारे सांडपाणी शुद्धीकरण न होताच नदीत मिसळले जात आहे. त्यामुळे नदीतील पाणी अत्यंत प्रदुषित झाले आहे. नदीतील वाळू पार उपसून खरडून नेण्यात आली आहे. नदीपात्रात सर्वत्र केरकचऱ्याचे ढीग आणि रानटी वनस्पती, झुडपे वाढलेली दिसतात. एकूणच नदीचे रूप ओंगळवाणे झालेले आहे. याला कारणीभूत कोण आहे याचा जर प्रामाणिकपणे शोध घेतला तर त्याचा अंगुलीनिर्देश आपल्या स्वत:कडेच म्हणजे समाजाकडेच आहे, असे स्पष्टपणे लक्षात येईल. आपल्या डोळ्यांदेखत सर्व प्रदुषणकारी गोष्टी नदीसंदर्भात घडत असतात आणि आपण धुळेकर मात्र संवेदना नष्ट झाल्यागत निर्विकारपणे हे सारे पाहत असतो. त्यामुळे आपल्याला मिळालेला हा अमुल्य ठेवा निर्मळ स्वरूपात कसा ठेवता येईल ही आता आपल्या चिंतेची प्रमुख बाब झाली पाहिजे. आणि समाजाने त्यात लक्ष घालून या सौंदर्यवती नदीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यावर आपले लक्ष केंद्रीत केले पाहिजे. ही आता काळाची गरज बनली आहे.

**जीर्ण होत चाललेल्या सांस्कृतिक आणि नागरी संवेदनांना संजिवनी :**

नदीला आपण माता म्हणतो आणि प्रतिवर्षी त्रिपुरारी पोर्णिमेला नदीत दिवे सोडून तिची पुजा अर्चना करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे, जी धुळ्यात पांझरेच्या बाबतीतही अद्याप पाळली जात आहे. पाण्याला तीर्थ संबोधून आपल्या संस्कृतीत उच्च स्थान दिलेले आहे. पण ज्या नदीला आपण मनोभावे पुजतो तीचे पाणी आज हातातही घेववत नाही इतके ते प्रदूषित आणि गलिच्छ झाले आहे. त्यामुळे आता हा प्रश्न विचारावा लागतो की कुठे लोप पावल्या आहेत आपल्या नदीच्या बाबतीतील या साऱ्या संवेदना आणि संस्कृतीच्या परंपरा ? आपल्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या दागिन्याला पुन्हा चकाकी आणण्यासाठी पार पाडावयाच्या आपल्या कर्तव्यांपासून आपण नेहेमिच असे दूर राहणार आहोत का ?

या साऱ्या दुरावस्थेतून पांझरेची पुर्वीची वैभवशाली अवस्था पुन्हा प्राप्त करून देण्याचे काम जलसंस्कृती मंडळाच्या धुळे शाखेने आता हाती घ्यायला हवे आणि समाज परिवर्तनाच्या तिन पायऱ्यांवरील कार्यवाहीला लगेच सुरूवात करून आपल्या जीर्ण होत चाललेल्या सांस्कृतीक आणि नागरी संवेदनांना संजिवनी दिली पाहिजे.

**पांझरा परिसराचे कल्पनेतील रम्य मनोहर चित्र :**

आपली ही सौंदर्यवती पांझरा धुळेकरांना कशी दिसावयास हवी असे त्यांना वाटते, हे सर्व प्रथम त्यांनी ठरवावे लागेल आणि त्या प्रमाणे ती तशी दिसावी यासाठी कोणकोणते अडथळे पार करावे लागणार आहेत याचा प्रामाणिक शोध घेऊन लोक सहभागातून, लोकांच्या सवयीमधे बदल घडवून आणून हे कार्य त्यांना तडीस न्यावे लागेल. माझ्या कल्पनेतील पांझरेचे आणि तिच्या परिसराचे चित्र डोळ्यासमोरून लगेच तरळून जात आहे. सुंदर मनमोहक पात्र असलेली पांजरा, त्यात जेवढे म्हणून पाणी आहे ते स्वच्छ आणि नितळ आहे, नदीपात्रात पर्याप्त प्रमाणात वाळू आहे, नदीकाठी लोकविहारासाठी सुंदर बागबगिचे, हिरवळी आहेत, कारंजे उडताहेत, नदी काठाने सुंदर रस्ते आहेत, दुतर्फा शोभिवंत झाडी आहे, तेथील सौंदर्य अधिक खुलवण्यासाठी महानगरपालिकेने परिसरात आकर्षक दिवाबत्ती केली आहे, नदीवरचे पुल सुशोभित केले आहेत, स्त्री–पुरूष, मुलेमाणसे परीसरात वावरण्याचा आनंद लुटत आहेत, सकाळ संध्याकाळ चालण्यासाठी, व्यायामासाठी लोक परीसरात विहार करत आहेत आणि एकूणच धुळे शहरात राहण्यातला मनस्वी आनंद उपभोगत आहेत – असे सरळ साधे मनोहर असे माझ्या कल्पनेतील पांझरेचे चित्र आहे.

**प्रत्यक्षातील कार्यवाहीची आखणी :**

हे चित्र प्रत्यक्षात उतरवणे खरोखर शक्य आहे का ? याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा निश्चित लक्षात येते की होय, ते संपूर्ण शक्य आहे. मग यासाठी प्रयत्न मात्र मनापासून करायला हवेत. नदीच्या प्रती आपलेपणाची भावना जोपर्यंन्त लोकांच्या मनात निर्माण होत नाही तोपर्यंन्त यात सुधारणा संभवत नाही. यासाठी धुळे शाखेने शहरात मोठ्या प्रमाणावर लोकप्रबोधनपर व्याख्याने, चर्चासत्रे यांच्या माध्यमातून सुयोग्य संवेदना लोकांच्या मनात निर्माण करण्याचे काम प्रथम हाती घ्यावे लागेल. त्यानंतर प्रभावित लोकांचे सुसंघटन तयार करून त्यांच्या सहभागातून नदी पात्र स्वच्छ करणे, ते नेहेमि स्वच्छ

राहील याबाबत लोकांमधे सतर्कता निर्माण करणे, त्यांच्या सवयींमधे बदल घडवून आणणे आदी बाबींवर लक्ष द्यावे लागेल.

असा लोक सहभाग लाभल्यास महानगरपालिकाही मग मागे राहणार नाही. शहराचे सांडपाणी शुद्धीकरण करूनच नदीत सोडले जाईल याकडे महापालिकेला प्रतिबद्ध करावे लागेल. नदीकाठी लोकांसाठी सुंदर बागबगिचे, हिरवळी, कारंजे निर्माण करणे, नदीकाठचे सौंदर्य अधिक खुलवणे, आकर्षक दिवाबत्ती करणे आदी उपाय महापालिकेच्या सहाय्याने हाती घेणे सहज शक्य होईल.

एकूणच नदी आणि नदीकाठचे सौंदर्य खुलले तर शहराच्या वातावरणात उत्साह खेळणार आहे आणि या साऱ्या प्रक्रीयेतून शहराच्या परिवर्तनास प्रारंभ होणार आहे. यासाठी अनेक औद्योगिक समुह आणि संस्था हातभार लावण्साठी पुढे सरसावतील. यानंतर बघा प्रगतीचे वारे धुळ्याच्या दिशेने वाहायला लागलेले आहेत असे आपल्याला प्रकर्षाने दिसायला लागेल. हे लिहीतांना मला पूर्ण आत्मविश्वास आणि खात्री वाटते. भारतीय जलसंस्कृती मंडळ धुळे शाखेस हे काम हाती घेण्यास बळ मिळो यासाठी आपण सर्व त्यांना शुभेच्छा देऊया.

शेवटी, लोक सहभाग निर्माण होण्यासाठी समाजात पाणीप्रश्नाभोवती आस्था व मनस्वी कळकळीची भावना असणे गरजेचे आहे. ती निर्माण झाली की जलसंस्कृती एक चळवळ होण्यास वेळ लागणार नाही. पाण्याचे महत्व, त्याची शुद्धता राखणे याची सर्वस्वी जबाबदारी अंगीकारुनच ही जनचळवळ सशक्त होऊ शकेल. असे झाले तरच जलसाहित्य संमेलनांचे आयोजन सफल झाले असे म्हणता येईल.

*****








**जलसाहित्य संमेलनाला उपस्थित श्रोतृवर्ग यात पुरूष आणि महिला, ज्येष्ठ नागरिक त्याचबरोबर तरूणाई आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले दिसत आहे. पाणी प्रश्नाची तीव्रता आणि जाणीव तर या उपस्थितीचे कारण नाही ना ?**





# अकरावे सम्मेलन डिजिटल झाले.............

डॉ. दत्ता देशकर, पुणे
मो : ९३२५२०३१०९



अकरावे सम्मेलन डिजिटल झाले.............
डॉ. दत्ता देशकर

भारतीय जल संस्कृती मंडळाने आतापर्यंत १० जल साहित्य सम्मेलने घेतली. महाराष्ट्रातील पाच विभागात प्रत्येकी दोन म्हणजेच विदर्भात दोन, मराठवाड्यात दोन, पश्चिम महाराष्ट्रात दोन, खानदेशात दोन आणि कोकणात दोन असे आतापर्यंतचे वाटप होते. यावर्षी खानदेशानी आघाडी मारली आणि अकरावे जल साहित्य सम्मेलन घेण्याचा मान धुळे शहराने मिळविला. या वर्षीच्या जल साहित्य सम्मेलनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ते प्रथमच डिजिटल झाले.

एक जल कार्यकर्ता म्हणून माझी प्रिंट मिडियाबद्दल एक तक्रार आहे. आजकाल सर्वच वर्तमानपत्रे दोन भागात वाटली गेली आहेत. वर्तमानपत्राचा मुख्य भाग व जिथून प्रकाशित होते त्या त्या शहराची पुरवणी. मुख्य भागात राज्याच्या, देशाच्या व आंतरराष्ट्रीय बातम्या असतात व पुरवणीत स्थानिक बातम्या असतात. राज्याचे जल साहित्य सम्मेलन व त्याची बातमी मुख्य भागात यावयास हवी की स्थानिक पुरवणीत? या सम्मेलनात राज्यासमोर असलेले पाणी प्रश्न, त्यांचा उद्गम, त्यावर उपाययोजना यावर सविस्तर चर्चा केली जाते. या चर्चेचा लाभ हा राज्यभरातील वाचकांना, अभ्यासकांना मिळावयास हवा. पण घडते मात्र वेगळेच. पुरवणीत पानेच्या पाने भरुन मजकूर येतो पण मुख्य भागात असे सम्मेलन झाले याची एक ओळही बातमीस्वरुपात येत नाही. या वेळच्या सम्मेलनातील जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांची खुली मुलाखत तर असामान्य झाली. देशातल्या प्रत्येक जल कार्यकर्त्यांने ती वाचावयासच हवी. (ती आम्ही पुस्तिकेच्या स्वरुपात लवकरच प्रकाशित करीत आहोत) पण आपली करंटी वर्तमानपत्रे मात्र आपला दृष्टीकोन कधी बदलतील याबद्दल चिंता वाटते.



डॉ. माधवराव चितळे सी.बी.पी माझा च्या टीम बरोबर

मध्यंतरी पुण्यातील एका नावाजलेल्या वर्तमानपत्राने आमच्या वर्तमानपत्रामध्ये काय सुधारणा व्हाव्यात याबद्दल चर्चा करण्यासाठी एक सामाजिक कार्यकर्त्यांची सभा बोलावली होती. मलाही त्या सभेचे निमंत्रण होते. त्या सभेत मी हा मुद्दा मांडताच सर्व उपस्थितांनी तो उचलून धरला. एवढेच नव्हे तर

वर्तमानपत्राच्या संपादक महाशयांनीही आपली त्रुटी मान्य केली. पण त्या त्रुटीची फक्त नोंद घेण्यापलिकडे काही झालेले दिसत नाही. कारण त्या वर्तमानपत्रात या ११ व्या जलसाहित्य सम्मेलनाबद्दल एक ओळही छापून आलेली नाही. यात स्थानिक बातमीदार कमी पडतात की संपादकीय कर्मचारी न कळे. असो. थोडेसे विषयांतर झाले. पण ते आवश्यकच होते म्हणून करावे लागले.

तर सांगण्यासारखी बाब म्हणजे ११ वे जल साहित्य सम्मेलन अक्षरशः डिजिटल झाले हो. सम्मेलनाचे दहा दिवस अगोदर मला श्री. अभिजित टिळक यांचा अनपेक्षित असा फोन आला. त्यांनी आपल्या टीम सीबीपी इंडिया (कम्युनिटी बुलेटीन प्रॉडक्शन कंपनी) या संस्थेचा परिचय करुन दिला व सदर सम्मेलनाचे लाइव्ह ब्रॉडकास्टिंग करणार असल्याची खबर दिली. सम्मेलनाचे आयोजक श्री. रावसाहेब बढे यांचेशी चर्चा केल्यानंतर त्यांनी हे प्रक्षेपण करणार असल्याचे सांगितले. आज कार्यबाहुल्यामुळे आपल्या वेळापत्रकातून दोन दिवस बाजूला काढणे कठीण असते. शिवाय बाहेरगावी जायचे म्हणजे प्रवासाची दगदग. पण जीव मात्र एखाद्या गोष्टीत गुंतलेला असतो. ती जर घरबसल्या मिळाली तर पाहिजेच असते. आता जल साहित्य सम्मेलनाचेच बघा ना. एवढा मोठा सोहळा पण जाता येत नाही म्हंटले तर मन खट्टू होते. अशी सोय घरबसल्या मिळाली तर आनंद होणारच. व तेही फक्त १० रुपयांत. जलप्रेमी संपूर्ण महाराष्ट्रभर विखुरलेले. त्यांचेसाठी तर ही गोष्ट पर्वणीच ठरणार होती.

जसजसे सम्मेलन जवळ येत गेले तसतसे वातावरण तापत गेले. टिळक आणि त्यांच्या साथीदारांकडून प्रश्नांच्या फैरीवर फैरी. सम्मेलनात कोणते वक्ते भाग घेणार, त्यांचेबद्दल माहिती कुठे मिळेल, त्यांचा फोटो तुमच्याजवळ आहे का, ते कोणत्या सत्रात आपले विचार मांडणार आहेत, एक ना अनेक प्रश्न. त्या प्रश्नांची उत्तरे देता देता तारांबळ उडत होती. एक दिवस त्यांची टीम घरी येवून पोहोचली. भारतीय जल संस्कृती मंडळ काय चीज आहे, ते कधी स्थापण्यात आले, कोणी स्थापना केली, जल साहित्य सम्मेलनाची कल्पना कोणाची, आता पर्यंत किती व कुठे सम्मेलने झालीत, सम्मेलनात कोणत्या विषयांची चर्चा होते यावर त्यांना माझी मुलाखत घ्यायची होती. घरातल्या फर्निचरची उलथापालथ झाली व घरात शूटींगसाठी योग्य जागा सापडल्यावर मुलाखत घेण्यात आली. नवीनच अनुभव असल्यामुळे मलाही कुतूहल वाटत होते.


धुळ्याला जाऊन पोहोचलो तर काय, आमच्या आधीच टिळकांची टीम तिथे कामाला लागली होती. सम्मेलनस्थळी एका बाजूला तात्पुरता स्टुडियो उभारला होता व त्यात प्रमुख कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात येत होत्या. इतक्या सर्व मुलाखती कधी दाखवणार हा प्रश्न विचारताच त्यांचा फिलर्स म्हणून वापर होणार असे सांगण्यात आले. प्रत्यक्ष कार्यक्रम सुरु झाला व मित्रांचे फोन येणे सुरु झाले. राज्यातील विविध ठिकाणी जलप्रेमी कार्यक्रमाची मजा घेत होते. संपूर्ण कार्यक्रमभर मित्रांचा फीडबॅक मिळत होता. चौकशी करता असे समजले की राज्यातूनच नव्हे, देशातून नव्हे तर परदेशातूनही काही जलप्रेमी जल साहित्य सम्मेलनाचा आस्वाद घेत होते. झाले की नाही आपले सम्मेलन डिजिटल? तीन हजार पेक्षा जास्त लोकांनी या संधीचा लाभ घेतला असावा असे वाटते.

आजच टिळकांकडून नवीन संदेश आला. सम्मेलनाचे काही भाग लवकरच पुन्हःप्रक्षेपित करण्याचा त्यांचा मानस आहे. ज्यांनी ही संधी आधी घेतली नाही त्यांनी याची नोंद घ्यावी आणि सम्मेलनाचे पुन्हःप्रक्षेपण बघावे.




आज दूरदर्शनचे एवढे मोठे जाळे निर्माण झाल्यावर सुद्धा रेडियोचे महत्व कमी झाले नाही बरं का. आपल्याला माहित आहे का की आपल्या राज्यात १६ एफएम रेडियो केंद्रे चालू आहेत. फिल्म इंस्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे यांचेही एक रेडिया स्टेशन आहे. त्यांचे संचालक श्री. संजय चांदेकर यांची अचानक भेट झाली. त्यांचेपर्यंत जल साहित्य सम्मेलनाची बातमी पोहोचलीच होती. त्यांनीही सम्मेलनात रस दाखविला. ते स्वतः सम्मेलनाला हजर राहिले. एवढेच नव्हे तर त्यांनी प्रसार माध्यमे व जलसाक्षरता या चर्चा सत्रात सहभागही नोंदविला. धुळ्याला जाण्याच्या आधी त्यांनी फिल्म इंस्टिट्यूटच्या रेडियोवर माझी मुलाखतही घेतली व तिचे बाकीच्या केंद्रावरुन प्रक्षेपण करायलाही मदत केली. या सम्मेलनाची क्षणचित्रे ते आता या माध्यमाद्वारे प्रसारित करणार आहेत.

अशा प्रकारे दृक्श्राव्य माध्यमांचा वापर या ११ व्या जल साहित्य सम्मेलनात झाला हे विशेष. ही दोनही माध्यमे मंडळाशी नव्याने जोडली गेली. याचा लाभ मंडळाला भविष्यात निश्चितच झाल्याशिवाय राहणार नाही.



## जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा निकाल

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पारितोषिक | शाळेचे नाव, संपर्क | चित्रकलेचा विषय | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | विजय नवल बहिरम | प्रथम | महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय धुळे ०२५६२ २२०२६९ | पाणी आणि प्रदूषण | १० वी |
| २ | पल्लवी राजेंद्र जिनगर | द्वितीय | एस. एस. पी. दुधेडिया हायस्कूल पारोळा रोड, धुळे ०२५६२ २३२३३२ | पाण्याचा पुनर्वापर | ७ वी |
| ३ | धनश्री किशोर शिंदे | तृतीय | गंगामाता कन्या विद्यालय,म्हसदी (प्र.नेर)९४२२७५२८३८ | पाणी आणि प्रदूषण | १० वी |
| ४ | समृद्धी विजय चौरसिया | उत्तेजनार्थ १ | कानोसा हायस्कूल धुळे ०२५६२ २८२६८० | पाण्याचा पुनर्वापर | ८ वी |
| ५ | इंदू आण्णा मारनर | उत्तेजनार्थ २ | माध्यमिक आश्रम शाळा , नगावहिल विद्यावाडी , धुळे-५ | पाणी आणि प्रदूषण | ८ वी |
| ६ | आशा दिवाणसिंग गिरासे | उत्तेजनार्थ ३ | सौ. सावित्रीबाई शिवाजीराव देवरे कन्या विद्यालय बोरीस. ता. जि. धुळे | पाण्याचा पुनर्वापर | १० वी |

## जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा निकाल

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पारितोषिक | शाळेचे नाव, संपर्क | चित्रकलेचा विषय | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुजा अंबादास गावडे | प्रथम | श्री. पिंपळादेवी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय मोहाडी उपनगर,धुळे ०२५६२-२३०४६६ | पाण्याची काटकसर | ९ वी |
| २ | चेतना संजय पाटील | द्वितीय | सरस्वती कन्या विद्यालय, फागणे ता. जि. धुळे २८९०६०,२८९७५९ | पाण्याचा पुनर्वापर | १० वी |
| ३ | निकिता राजेंद्र बाविस्कर | तृतीय | कमलाबाई शंकरलाल कन्या शाळा धुळे, साक्री रोड, धुळे २३८९२४, २४१४०२ | पाण्यचा पुनर्वापर | ९ वी |
| ४ | विवेक पंडीत तावडे | उत्तेजनार्थ | श्रीमत गोविंदराव संपतराव माध्यमिक विद्यालय विरदेल ९५०३८४७७८८ | पाण्याची काटकसर | ९ वी |
| ५ | रिया रविंद्र तलवारे | उत्तेजनार्थ | श्री.एकविरा देवी माध्यमिक विद्यालय देवपूर, धुळे. एम पी.पाटील मॅडम ९४२२३७३३८२ | पाण्याची काटकसर | ९ वी |
| ६ | दिग्विजय जयवंत भामरे | उत्तेजनार्थ | जय हिंद हायस्कूल देवपूर धुळे , संपर्क - ७५८८००१४४५ | पाण्याची काटकसर | १० वी |

## वक्तृत्व स्पर्धा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | दिपाली दिलीप पवार | प्रथम | कै. जे.आर.डी. शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय पिंपरखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक | पाणी आणि प्रदूषण | १० वी |
| २ | नीलम विनायक घडवजे | द्वितीय | | पाण्याची काटकसर | १० वी |
| ३ | जयश्री दगू संसारे | तृतीय | | पाण्याचा पुनर्वापर | १० वी |



सम्मेलन स्थळी जलदिंडीचे स्वागत करतांना



स्मरणिकेचे प्रकाशन



आमदार श्री. कुणाल पाटील जलगौरव पुरस्कार स्विकारतांना



एमडब्ल्यूआरआरचे नवनियुक्त सदस्य डॉ. शिवाजी सांगळे यांचा सत्कार

**जलसंवाद REGISTERED PERIODICAL**
Postal license no.PCW/108/2018-2020 (Posting at Ganeshkhind SO on 10th of every month)
RNI No. MAHMAR/2012/41686.DECL No. SDM/PUNE/SR/416/2012 ISBN No. 978-81-924949-0-6




सम्मेलनाचा समारोपः प्रमुख पाहुणे श्री. अविनाश सुर्वे, कार्यकारी संचालक, विदर्भ सिंचन विकास महामंडळ

प्रकाशक व मुद्रक: डॉ. दत्ता देशकर
फोन: 09325203109
jalasamvad@gmail.com
dgdwater@gmail.com
जलसंवाद प्रकाशन
ओ-201, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लबजवळ,
बाणेर हिल्स, बाणेर, पुणे 411 045